**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०४

निर्णय दिनांक ०१-१२-२००७

१ श्री. गोरख वामन पवार, : अपिलार्थी

प्लॉट नं. २०१, श्रध्दा कॉलनी,

धूत हॉस्पिटल समोर, म्हाडा,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा प्रादेशिक व्यवस्थापक,

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,

मर्यादित, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा व्यवस्थापकीय संचालक,

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ,

मुंबई - ६६

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गोरख वामन पवार, जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ व जन

अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०८-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एन. एस. एफ. डी. सी. योजनेसंदर्भात, १९९० ते २००५ पर्यतच्या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ श्री. सिरसाट तालुका कळंब जिल्हा नांदेड यांनी मा. जि. व्यवस्थापक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्या. नांदेड जिल्हा कार्यालयातून एन. एस. एफ. डी. सी. योजने मार्फत ट्रॅक्टर घेतलेले आहे. त्यांना कोणत्या आदेशाने ट्रॅक्टर मंजूर झालेले आहे त्या मंजूर आदेशाची झेरॉक्स प्रत व त्यांनी आतापर्यत महामंडळास परतफेडीचे किती हप्ते भरले ? व किती थकबाकीत आहेत.”

अपिलार्थीने सदर माहिती सर्वसाधारणपणे टपालाने व साक्षांकीत करुन मागितली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या पत्रास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील करतांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती दिली नसल्याचे अपिलार्थीने या अपील अर्जामध्ये नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यापैकी कोणीही सुनावणीस हजर नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत जन माहिती अधिकारी हे माहिती का देऊ शकले नाहीत याची कारणे आयोगास उपलब्ध होऊ शकली नाहीत. तथापि अपिलार्थी यांच्यातर्फे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी व्दितीय अपील करेपर्यंत देखील कोणतीही माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन स्वतःला अधिनियमातील कलम २० प्रमाणे कार्यवाही करण्यास पात्र ठरविले आहे. याचबरोबर अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये माहिती न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई देखिल स्पष्ट केली आहे. सबब, त्यांनी दाखविलेल्या अशा प्रकारच्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (सामाजिक न्याय) यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अहवाल आयोगास तीस दिवसाच्या आत पाठवावा असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न पुरविल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांच्यावर का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास करावा.

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीच्या अर्जावर, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील आवश्यक त्या तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत योग्य ती कारवाई करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जावर, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील आवश्यक त्या तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत योग्य ती कारवाई करावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती न पुरविल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांच्यावर का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आयोगास करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेला आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (सामाजिक न्याय) यांनी हे आदेश निर्गमीत

झाल्यापासून तीन महिन्याच्या आत प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन तदनंतर आपला अहवाल आयोगास तीस दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोरख वामन पवार, प्लॉट नं. २०१, श्रध्दा कॉलनी, धूत हॉस्पिटल समोर, म्हाडा, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रादेशिक व्यवस्थापक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मर्यादित, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे विकास महामंडळ, मुंबई – ६६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सामाजिक न्याय), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०५

निर्णय दिनांक ०१-१२-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. वसंत संपतराव मुंढे,<br>श्री. बाळाजी ट्रेडर्स आडत दुकान,<br>गौरीकुंज मार्केट, परळी वैजनाथ,<br>जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई,<br>जिल्हा बीड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. वसंत संपतराव मुंढे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ श्री. चंद्रशेखर प्रभाकर जोशी (यापुढे त्यांना जन अपिलीय

अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २४-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००१ ते २००५ या कालावधीतील केंद्रीय निधी मधून मंजूर झालेल्या कामासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" केंद्रीय निधी मधून मंजूर झालेली कामे, पूर्ण झालेली कामे, यावरील अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तीका मधील संपूर्ण नोंदी इ."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये १३८४० (अक्षरी रुपये तेरा हजार आठशे चाळीस फक्त) त्यांच्या कार्यालयात भरण्याबाबत अपिलार्थीस कळविले.

तथापि तत्पुर्वीच, विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले होते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०४-२००६ रोजी सुनावणी घेऊन या प्रकरणी आपले आदेश दिनांक ०२-०५-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी जन माहिती अधिका-यास अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विनामूल्य व तात्काळ देण्याचे आदेशीत करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या अपील निर्णयामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस किती दिवसात माहिती द्यावयाची आहे याचा उल्लेख केलेला नाही, या बाबीची नोंद घेण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय होऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये देखील अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन केंद्रीय निधी अंतर्गत केलेली कामे निकृष्ट झाल्याचे आपले अभिप्राय या अर्जात नमूद केले आहेत.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची आजही त्यांना आवश्यकता आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास ते आजही तयार आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, या संपूर्ण प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात टाळाटाळ केल्याचे सिःसंशयपणे सिध्द होत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही आजतागायत म्हणजे सुमारे दीड वर्षाचा कालावधी ओलांडून गेल्यानंतरही, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा आस्तित्वात आल्याचे जन माहिती अधिकारी यांना माहिती असूनही, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना न देण्याचे कारण आयोगास समजत नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, सदर माहितीचे स्वरुप फार मोठे होते किंवा सदर माहिती गोळा करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांना फार मोठ्या मनुष्यबळाची आवश्यकता होती अथवा त्यांच्याकडे उपलब्ध असलेली साधनसामुग्री प्रमाणाबाहेर वापरण्याची आवश्यकता होती असे आयोगास वाटत नाही. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा त्यांच्या या कृतीव्दारे स्पष्ट केला आहे. त्यामुळे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या कारवाईस देखील त्यांची पात्रता त्यांनी सिध्द केली आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल व यायोगे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल सचिव, (सार्वजनिक बांधकाम) यांनी जन माहिती अधिकारी यांचेवर त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल तदनंतर १ महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. त्याच प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीस या प्रकरणी त्यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याबद्दल त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० याप्रमाणे एकूण रुपये २५,००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत करावा. जन माहिती अधिकारी यांचा खुलासा प्राप्त झाल्यानंतर आवश्यकता वाटल्यास प्रकरणातील संबधीत आदेश अलाहिदा निर्गमीत करण्यात येतील. जन माहिती अधिकारी यांना पुढे असेही आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या कालावधीमध्ये माहिती न पुरविल्याबद्दल माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांच्यावर का लावण्यात येऊ नये याचा खुलासा, त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेला आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव, (सार्वजनिक बांधकाम) यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत प्रचालीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास १ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. वसंत संपतराव मुंढे, श्री. बाळाजी ट्रेडर्स आडत दुकान, गौरीकुंज मार्केट, परळी वैजनाथ, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (सार्वजनिक बांधकाम), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०७

निर्णय दिनांक ०१-१२-२००७

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बस स्टॅण्ड रोड,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, नांदेड

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी | : | सहयोगी प्राध्यापक, औषधशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय, नांदेड |
| जन अपिलीय अधिकारी | : | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय, नांदेड |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ हे गैरहजर आहेत तर, जन माहिती अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक, औषधशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय श्री. राजेश सुधाकर हिरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय श्री. देविदास सितारामपंत कुलकर्णी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या महाविद्यालयामध्ये नेमलेल्या कर्मचा-यांच्या यादीची मार्च १९९८ ते जून २००५ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

" शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाअंतर्गत मार्च १९९८ पासून ते जून २००५ पर्यत वैद्यकीय महाविद्यालयातर्फे रुग्णालयास वगळून घेतलेल्या चतुर्थ श्रेणी व व्दितीय श्रेणी कर्मचा-यांना कायम स्वरुपी नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांची यादी. तसेच या भरतीसाठी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीची झेरॉक्स प्रत."

सदर माहिती अपिलार्थीने साधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीच्या मागणीमध्ये बदल करुन त्यांनी तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी पदी कायम स्वरुपी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची यादी मागितली आहे.

अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००६ रोजी अपील दाखल करण्यापुर्वी त्यांच्याकडील दिनांक २२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये जन अपिलीय अधिकारी यांना असे लेखी निवेदन दिले की, त्यांनी दिनांक १८-०२-२००६ रोजी मागितलेल्या माहितीची त्यांना गरज नाही. अपिलार्थीस सदर माहितीची खरोखरच आवश्यकता नाही असे वाटल्यावरुन जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाची सुनावणी घेतली नाही.

माहितीची आवश्यकता नाही असे जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २२-०३-२००६ रोजी कळवून देखील, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची माहिती मागितल्याचे दिसून येते. याचबरोबर त्यांनी या अपील अर्जामध्ये, त्यांनी दिनांक २४-

०३-२००६ रोजी अपील दाखल करुन सुध्दा माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून जाणुन-बुजून टाळाटाळ होत असल्यामुळे त्यांनी आयोगाकडे हे व्दितीय अपील केल्याचे म्हटले आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे हजर नाहीत त्यामुळे त्यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये केलेली विधाने हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १८-०२-२००६ रोजी दाखल झाल्यानंतर, त्यांनी लगेच संबंधीत लिपिकास अपिलार्थीने मागितलेली माहिती ३ दिवसात सादर करण्याच्या लेखी सूचना त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिल्या. तदनंतर त्यांनी संबंधीत कर्मचा-याकडे या प्रकरणासंदर्भात लेखी पाठपुरावा देखील केला. तथापि दिनांक २२-०३-२००६ रोजी अपिलार्थीने अधिष्ठाता यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राचे त्यांनी अवलोकन केल्यानंतर, अपिलार्थीस या माहितीची गरज नसल्याने त्यांना वाटल्याने त्यांनी तदनंतर पुढे कोणतीही कारवाई केली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व वरील घटनाक्रम पाहता, अपिलार्थी हे त्यांनी मागणी केलेल्या माहितीबाबत कितपत गंभीर आहे याबाबत आयोग साशंक आहे. कारण अपिलार्थीने मूळ अर्जामध्ये व्दितीय व चतुर्थ श्रेणीच्या कायम स्वरुपी नेमणुका केलेल्या कर्मचा-यांची यादी मागितली आहे, तर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जामध्ये तृतीय श्रेणी व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचा-यांची यादी मागितली आहे. अशा प्रकारे अपिलार्थीच्या मागणीमध्ये आयोगास विसंगती दिसून येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांना त्यांच्याकडील दिनांक २२-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये सदर माहितीची त्यांना गरज नसल्याचे म्हटले आहे. परंतु लगेचच

दिनांक २४-०३-२००६ रोजी त्यांच्याकडेच सदर माहिती संदर्भात प्रथम अपील दाखल केले आहे. वास्तविकतः जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००६ रोजीच्या या अपिलावर अधिनियमाव्दारे विहित मुदतीत निर्णय घेणे अधिनियमाच्या तरतुदीनुसार अपेक्षित आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. त्यांनी सुनावणीही घेतली नाही व अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कोणता पत्रव्यवहारही केला नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील विसंगती व अपिलार्थीने अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय नांदेड यांना माहितीची आवश्यकता नसल्याबाबतचे दिलेले पत्र, व आजच्या सुनावणीस अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता, या माहितीसंदर्भात अपिलार्थी गंभीर नसल्याचे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांना वेगवेगळ्या विषयावरील माहिती कायम विचारत असून सदर माहितीचे तक्रार अर्ज नंतर ते वेगवेगळ्या सह्या करुन मागे घेत असतात. त्यांच्या म्हणण्यापुष्ठ्यर्थ त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले तक्रार अर्ज व सदर तक्रार अर्ज मागे घेत असल्याबाबत अपिलार्थीची स्वाक्षरी असलेली पत्रे आयोगास दाखविली. अपिलार्थीच्या या वर्तनाची नोंद या अपिलावर निर्णय देतांना आयोगाने घेतली आहे. या प्रकरणात अपिलार्थीने वेळोवेळी घेतलेल्या विसंगत भूमिकेमुळे व त्यांना माहितीची गरज नसल्याचे त्यांनी दिनांक २२-०३-२००६ रोजीच्या पत्रात म्हटल्यामुळे अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले दिनांक १५-०५-२००६ रोजीचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बस स्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहयोगी प्राध्यापक, औषधशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविदयालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्रमांक २००७/रामाआ/तक्रार/सिआर/१८

निर्णय दिनांक ०३-१२-२००७

१ श्री. दयाराम दत्तात्रय चाटे, : तक्रारदार

मु. लाडझरी, पो. घाटनांदूर, तालुका परळी, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी : उत्तरवादी

तथा उप विभागीय अभियंता,

लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, अंबाजोगाई,

जिल्हा बीड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस तक्रारदार श्री. दयाराम दत्तात्रय चाटे व जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता यापैकी कोणीही हजर नाहीत.

या प्रकरणी तक्रारदाराने त्यांच्याकडील दिनांक ०५-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे उत्तरवादीविरुध्द तक्रार केली आहे. तक्रारदाराच्या सदर तक्रारीची नोंदणी राज्य माहितीच्या आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक २५-०७-२००६ रोजी घेण्यात आली आहे.

या तक्रारीमध्ये त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, त्यांनी उत्तरवादी यांच्याकडून, त्यांना अपेक्षित असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये ६२० (अक्षरी रुपये सहाशे वीस फक्त) इतके उत्तरवादी यांच्या कार्यालयात त्यांनी सूचित केल्याप्रमाणे भरले होते. सदर शुल्क त्यांनी उत्तरवादी यांच्या कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. अ. पं. इंगळे यांच्याकडे दिनांक ०५-०७-२००५ रोजी भरले होते. तथापि रुपये ६२० इतके शुल्क भरल्यानंतरही त्यांना उत्तरवादी यांच्याकडून एकूण १६९ इतक्या पृष्ठांची माहिती प्राप्त झाली. त्यांनी आयोगाकडे केलेल्या तक्रार अर्जासोबत, संबंधीत लिपिकाचे रुपये ६२० मिळाल्याची नोंद असलेले दिनांक ०५-०७-२००५ चा कागद व त्यांनी दिनांक २७-१०-२००५ रोजी प्राप्त करुन घेतलेली माहिती १६९ पृष्ठांची असल्याबाबतचे पत्र आयोगास सादर केले आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने दिनांक ११ ऑक्टोंबर २००५ रोजी जारी केलेल्या अधिसूचना क्रमांक आरटीआय-२००५/सीआर/३१५/०५/५ मधील कलम ४ (१) प्रमाणे माहितीचा

अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे अर्जदारास माहिती द्यावयाची झाल्यास त्यासाठी रुपये २ इतके प्रती पृष्ठ व पोस्टाचा खर्च असे शुल्क आकारण्याचे सूचित केले आहे. अधिनियमातील सदर सूचना पाहता तक्रारदारास उत्तरवादीने केलेल्या शुल्काची आकारणी जादा असल्याचे दिसून येते. तथापि तक्रारदाराने आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या इतर कागदपत्रावरुन असे दिसून येते की, तक्रारदाराने उत्तरवादी यांच्याकडे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीनुसार अर्ज केल्याचे दिसून येते. या अधिनियमातील कलम ६ (३) च्या तरतुदीमध्ये नमूद केलेले परिशिष्ट पाहता महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ आस्तित्वात असतांना माहितीसाठी आकारण्यात येणा-या शुल्काचा दर ५० पैसे प्रती पृष्ट अधिक टपाल खर्च इतका निश्चित करण्यात आल्याचे दिसून येते.

तेव्हा उत्तरवादी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी तक्रारदारास दिलेल्या माहितीसंदर्भात प्रती पृष्ट ५० पैसे या दराने आकारणी करुन, उर्वरीत सर्व रक्कम तक्रारदारास हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत परत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास ७ दिवसाच्या आत सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर तक्रारदाराचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. उत्तरवादी यांनी तक्रारदारास प्रती पृष्ट ५० पैसे अधिक टपाल खर्च या दराने आकारणी करुन तक्रारदाराकडून प्राप्त करुन घेतलेल्या जादा शुल्काची रक्कम तक्रारदारास ७ दिवसाच्या आत परत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दयाराम दत्तात्रय चाटे, मु. लाडझरी, पो. घाटनांदूर, तालुका परळी, जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

४ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/६२५

निर्णय दिनांक ०३-१२-२००७

१ श्री. विष्णू अशोकराव सटाले, : अपिलार्थी
रा. गळनिंब, पो. अगरवाडगाव,
तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी,

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, गंगापूर,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा व्यवस्थापकीय संचालक,

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी | : | स्थावर व्यवस्थापक, गंगापूर मळा, पो. रघुनाथनगर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद |
| जन अपिलीय अधिकारी | : | मुख्य कार्यकारी (प्रशासन), महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ म. २७०, भांवूडी, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ०१६ |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विष्णू अशोकराव सटाले (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा स्थावर व्यवस्थापक, गंगापूर मळा श्री. सुरगोंडा देवगोंडा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन), महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ श्री. प्रकाश संपतराव पाटील (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००३ ते ०६-०५-२००६ या कालावधीतील

औरंगाबाद जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा शिवारातील सर्व्हे नंबर ३५ व ३७ ते ४१ बाबत खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

“१. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४१ यातील किती क्षेत्र आपण मला सयुक्त शेतीसाठी कोणत्या तारखेपासून ताब्यात दिले.

२. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३७, ३८, ४० याची मोजणी आपले मोजणी अधिकारी श्री. अग्नीहोत्रीसाहेब यांनी फेब्रुवारी-मार्च २००४ मध्ये केली होती त्या मोजणीची सत्यप्रत मिळावी.

३. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४१ या संपूर्ण क्षेत्राची मोजणी केव्हा करण्यात आली व त्या मोजणीची सत्यप्रत मिळावी.

४. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४१ या लगत सहामंडळाची दुसरी जमीन आहे काय ?

५. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४१ यातील पडीक क्षेत्र सध्या किती आहे व ते किती वर्षापासून पडीक आहे. तसेच सदरील पडीक क्षेत्र महामंडळाचे आहे की, जायकवाडीने संपादीत केलेले आहे याची माहिती द्यावी.

६. भिवधानोरा शिवारातील सर्वे नं. ३५, ३७, ३८, ३९, ४०, ४१ याचे जमीन एकत्रीकरण योजनेमध्ये कोणते गट नं. तयार झाले व त्यात प्रत्यक्षात महामंडळाचे क्षेत्र किती आहे व जायकवाडी संपादीत क्षेत्र किती आहे ?”

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दिनांक २६-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर अपिलार्थीने दिनांक लिहिलेला नाही, तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-०६-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे सुनावणीमध्ये अपिलार्थी यांनी सांगितले.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस काही माहिती दिल्याचे दिसून येते.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये, त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणुन-बुजून चुकिची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याचे म्हटले आहे. तद्वतच जमीन मालकाच्या विसंगत माहितीमुळे, त्यांच्यावर अतिरिक्त कराचा बोजा पडला असल्याचे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे महाराष्ट्र शेती महामंडळाने भिवधानोरा शिवारातील सर्व्हे नंबर ३५ व ३७ ते ४१ या सर्व्हे नंबर मधील एकूण ७४ एकर इतक्या क्षेत्राची जमीन संयुक्त शेतीसाठी वापर मुल्याने दिली आहे. तथापि त्यांच्याकडे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाने वापर मुल्यांची मागणी करतांना एकूण २० एकर इतक्या वाढीव क्षेत्राच्या वापर मुल्याची मागणी केली आहे.

त्यांच्याकडे प्रत्यक्ष वापरासाठी उपलब्ध असलेले क्षेत्र व त्यांच्याकडून वसूल करण्यात येणारे वापर मुल्यातील संदर्भीय क्षेत्र या दोन्हीमध्ये विसंगती असून तिचा ताळमेळ घालण्याच्या दृष्टीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती आवश्यक आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडील अभिलेख्याची आता पाहणी केली असता अपिलार्थीवर त्यांनी जादा क्षेत्राचे वापर मुल्य आकारले आहे. गेल्या ४ वर्षात त्यांनी अपिलार्थी यांच्याकडून जादा वापर मुल्याची वसूली देखील करुन घेतली आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी विदित करतांना, त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, भिवधानोरा शिवारातील गट नंबर २४९ (ज्यामध्ये सर्व्हे नंबर ३५ व ३७ ते ४१ यांचा समावेश आहे) क्षेत्र १२९ एकर २२ गुंठे इतके शासनाने ३ वर्षाच्या लीजने महाराष्ट्र शेती महामंडळास १९६५ मध्ये हस्तांतरीत केले होते. हीच जमीन पुढे शासनाने १९८३ साली शेती महामंडळाला कायमस्वरुपी दिली. १९६५ ते १९८३ या कालावधीत या क्षेत्रापैकी ५८ एकर ५ गुंठे जमीन जलसंपदा विभागाने जायकवाडी प्रकल्पाकरिता संपादीत केली होती. जलसंपदा विभागाने संपादीत केलेल्या जमिनीची नोंद महाराष्ट्र शेती महामंडळाच्या अभिलेखामध्ये काही कारणास्तव घेतली गेली नाही त्याचा परिणाम अपिलार्थी यांचेवर जादा वापर मुल्य लावण्यात झाला.

तथापि अभिलेख्यामधील सदर चूक आता १५ दिवसात दुरुस्त करुन, अपिलार्थीस लावलेल्या जादा वापर मुल्याचा ताळमेळ यापुढे लावण्यात येऊन वापर मुल्य निश्चित करण्यामध्ये यापुढे काळजी घेतली जाईल असे जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास आश्वासीत करण्यात आले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या कृतीमुळे अपिलार्थीच्या मूळ गा-हाण्याचा निपटारा होणार आहे.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे विचारलेल्या मूळ माहितीविषयी विचारणा केली असता जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती दिलेली असून, माहिती देतांना त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती दिली असून ती बरोबर आहे व त्यामुळे अपिलार्थीस जाणुन-बुजून चुकिची माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने विचारलेली माहिती अपिलार्थीस मिळाली असून, अपिलार्थीस शेती महामंडळाने लावलेल्या जादा वापर मूल्याबाबत त्यांची तक्रार होती. तथापि आजच्या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील अभिलेख्यामधील चूक मान्य करुन अपिलार्थीच्या तक्रारीचे येत्या १५ दिवसात निवारण करण्याचे मान्य केल्याने व आज देखील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस परत माहिती दिल्याने व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत मूळात योग्य तो प्रतिसाद दिलेला असल्यामुळे अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. स्थावर व्यवस्थापक, गंगापूर मळा, पो. रघुनाथनगर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील गंगापूर शेतमळ्यासंदर्भातील आपल्या जमिनीचे सर्व अभिलेखे हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत दुरुस्त करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विष्णू अशोकराव सटाले, रा. गळनिंब, पो. अगरवाडगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा स्थावर व्यवस्थापक, गंगापूर मळा, पो. रघुनाथनगर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी (प्रशासन), महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ म. २७०, भांवूडी, सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११ ०१६ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०६

निर्णय दिनांक ०३-१२-२००७

१ श्री. लक्ष्मीकांत पंडितराव देशपांडे, : अपिलार्थी
व्दारा - श्री. पी. डी. देशपांडे,
घर नं. डी / १३९, आशिर्वाद, एकता कॉलनी,
वसमत रोड, परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, वित्त विभाग (कार्यासन
सेवा ९), मंत्रालय, मुंबई – ३२

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसचिव, वित्त विभाग (कार्यासन सेवा-
१० / सेवा ९), मंत्रालय, मुंबई – ३२

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२
जन अपिलीय अधिकारी : उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. लक्ष्मीकांत पंडितराव देशपांडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय श्री. आनंदराव श्रावण जिवने (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय श्रीमती नसीमा मकसूद शेख (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १८-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून सहाय्यक आरेखक या पदाच्या वेतन निश्चितीची ३१ ऑक्टोंबर १९९८ ते ३१ मे २००४ या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

या माहितीमध्ये -- त्यांची वेतन निश्चिती म. ना. सेवा (वेतन) १९८१ च्या नियम ११ (१) (ए) मधील तरतुदीनुसार होईल की, सदर नियमाच्या नियम ११ (१) (ब) मधील तरतुदीनुसार होईल -- असा खुलासा अपेक्षित असणा-या माहितीचा समावेश होता व त्याचबरोबर त्यांनी केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या १९ ऑक्टोंबर १९९४ च्या कार्यालयीन ज्ञापनाच्या व या संदर्भातील केंद्र शासनाने निर्गमीत केलेल्या आदेशाच्या प्रती मागविल्या होत्या.

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या या संदर्भातील परिपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस दिल्या आहेत व केंद्र शासनाच्या संबंधीत कागदपत्राच्या प्रती केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाकडे मागविण्याचे त्यांना या पत्रात सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या दिनांक १४-०५-२००५ रोजीच्या पत्रासंदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत दिनांक २४-०१-२००६ रोजी साध्या पत्राव्दारे एक संदर्भ केला व परत यांच्याकडून खुलासा अपेक्षित असणारी माहिती मागविली. अपिलार्थीने या पत्राची प्रत जलसंपदा विभागासही दिली आहे. अपिलार्थीच्या या पत्रासंदर्भात जलसंपदा विभागाने त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. या पत्रामध्ये त्यांनी, अपिलार्थीस त्यांची शासनाच्या प्रचलीत आदेशानुसार वेतन निश्चिती झाली नसल्यास याबाबतचे सुस्पष्ट निवेदन / प्रस्ताव शासनस्तरावर निर्णय घेण्याकरिता पाठविण्याचे सूचित केले.

तदनंतर अपिलार्थीनी त्यांच्या दिनांक २४-०१-२००६ च्या पत्राचे उत्तर जन माहिती अधिकारी वित्त विभाग यांच्याकडून प्राप्त न झाल्याने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे वर निर्देशित केलेल्या दिनांक २४-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले. अपिलार्थीचे सदर पत्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे पाठविले नव्हते त्यामुळे अपिलार्थीने दाखल केलेले पत्र अपील म्हणून ग्राह्य धरता येत नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना दिनांक ०७-०४-२००६ रोजी कळविले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने व्यथित होऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. सदर अपील करण्याचे कारण म्हणजे त्यांनी दिनांक २४-०३-२००६ रोजी केलेल्या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही उत्तर त्यांना प्राप्त झाले नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलामधील त्यांचे मांडलेले लेखी म्हणणे, हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने केलेला दिनांक १८-११-२००५ चा अर्ज त्यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०६-१२-२००५ रोजी प्राप्त झाला. सदर अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी संबंधीत असलेल्या वित्त विभागाच्या दिनांक २४-०५-९९ व ०८-०३-२००४ च्या परिपत्रकाच्या प्रती अपिलार्थीस त्यांचेकडील दिनांक १४-१२-२००५ च्या पत्रान्वये पाठविल्या

आहेत.   त्यानंतर अपिलार्थीने, त्यांच्या दिनांक २४-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीबाबतचा नियम कळविण्याची त्यांना विनंती केली होती.  अपिलार्थीने दिनांक २४-०१-२००६ रोजी त्यांच्याकडे दिलेले पत्र हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीमध्ये केले नव्हते व त्याचबरोबर त्यांनी त्याची एक प्रत जलसंपदा विभागास पाठविली होती.  जलसंपदा विभागाने या पत्रासंबंधी, त्यांचा निर्णय अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०८-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविला होता. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, मुळात अपिलार्थीने त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीअन्वये दाखल केलेले अपील हे त्यांनी केलेल्या एका वेगळ्या अर्जासंदर्भात ( दिनांक २४-०१-२००६ रोजी केलेल्या अर्जासंदर्भात) होते.  अपिलार्थीने केलेला मूळ अपिल अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार नव्हता त्यामुळे सदर अपिलावर निर्णय घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १८-११-२००५ रोजीच्या अर्जास जो त्यांच्याकडे दिनांक ०६-१२-२००५ रोजी प्राप्त झाला होता त्यास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-१२-२००५ रोजीच्या पत्राने उत्तर दिले आहे.  अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांचे समाधान झाले नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये सर्वसाधारण परिस्थितीत अपील करणे अभिप्रेत आहे.  तथापि अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर परत दिनांक २४-०१-२००६ रोजी त्यांचा खुलासा मागविणारे पत्र

लिहिले व या पत्रावर त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्रथम अपील निर्णयाची अपेक्षा केली आहे. अपिलार्थीची ही कृती चुकिची असून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करणे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिप्रेत आहे. याचबरोबर अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपीलामध्ये, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक २४-०३-२००६ रोजी दिलेल्या पत्रासंदर्भात कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याने अपील केल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीची त्यांच्या या पत्रावर जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोग यांनी सुनावणी घ्यावी हा त्यांचा आक्षेप चुकिचा आहे. मुळात त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील करतांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिल करणे भाग होते. तथापि त्यांनी तशी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. तद्वतच, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासेवजा, स्पष्टीकरण करणारी माहिती विचारली, जी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २ (च) प्रमाणे स्पष्ट केल्याप्रमाणे "माहिती" या शब्दाच्या व्याख्येमध्ये बसत नाही. अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती "माहिती" या व्याख्येत बसते, अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत दिली असल्याने व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी व राज्य माहिती आयोगाकडे केलेले अनुक्रमे प्रथम व व्दितीय अपील चुकिच्या गृहितकावर आधारीत असल्यामुळे व ते माहितीचा अधिकार अधिनियमातील कोणत्याही प्रक्रियेशी संबंधीत असल्याचे सिध्द होत नसल्याने आणि माहितीचा अधिकार प्रक्रियेचा कोणत्याही प्रकारे भाग असल्याचे सिध्द होत नसल्याने सदर अपील फेटाळण्यायोग्य आहे, या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. लक्ष्मीकांत पंडितराव देशपांडे, व्दारा - श्री. पी. डी. देशपांडे, घर नं. डी / १३९, आशिर्वाद, एकता कॉलनी, वसमत रोड, परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०८

निर्णय दिनांक ०३-१२-२००७

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी

संपादक सत्यवृत्त,

मिल कॉर्नर, बस स्टॅण्ड रोड,

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल व

कनिष्ठ महाविद्यालय, चैतन्यनगर, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद, नांदेड

जिल्हा नांदेड

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय श्रीमती मेहराजुन्नीसा (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद श्री. अशोक देवकरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मार्च १९९८ ते ३१ जानेवारी २००६ या कालावधीतील त्यांच्या शिक्षण संस्थेतील कर्मचारी नियुक्तीसंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" सदरील शाळेच्या शिक्षकांची, लिपिकांची, चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची कायमस्वरुपी नियुक्तीसाठी सदरील संस्थेच्या ठरावाची सत्यप्रत, शिक्षणाधिकारी, यांच्याकडून मंजूर झालेले मंजूरी संचिकाची सत्यप्रत व निर्णयानुसार सदरील कायमस्वरुपी नियुक्ती करण्यासाठी नियुक्तीपुर्वी दिलेल्या वृत्तपत्राची जाहिरातीच्या वृत्तपत्राची सत्यप्रत मिळणेबाबत."

सदर माहिती अपिलार्थीने सर्वसाधारण टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगने पाठविला होता. त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज केल्यासंदर्भातील पुरावा मागता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पाठविलेल्या अर्जासंदर्भातील सर्व रेकॉर्ड नांदेड येथील मागील वर्षातील पुरामुळे वाहून गेल्याचे अपिलार्थी यांनी आज आयोगास सांगितले तर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्याकडून अशा प्रकारचा कोणताही अर्ज त्यांच्या कार्यालयास प्राप्त झाला नसल्याचे आयोगासमोर आज सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले. सदर अपील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक ०३-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२ एप्रिल २००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, त्यांनी ही माहिती संबंधीत संस्थेच्या मुख्याध्यापकाकडून प्राप्त करुन घ्यावी असे सूचित केले व या पत्राची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना देऊन अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्याचे या पत्रामध्ये सूचित केले.

तथापि तदनंतरही ही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये, त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये अपिलार्थीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आजपर्यंत त्यांनी मागितलेली पूर्ण माहिती मिळाली नाही. आज सुनावणीच्या दिवशी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून जी माहिती प्राप्त झाली ती अपूर्ण असून त्यामध्ये त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी "वृत्तपत्रातील जाहिरातीची प्रत" या मुद्दयावरील माहिती त्यांना अद्यापही प्राप्त झालेली नाही, त्यामुळे त्यांना अपूर्ण व उशीरा माहिती मिळाल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहितीची मागणी करुन, त्यांनी दिलेली माहिती स्विकारत नाही आणि त्यांना मानसिक त्रास देत असतात. याचबरोबर अपिलार्थीचा सदर माहितीचा अर्ज यांच्याकडे प्राप्त झाला नसल्याने, यावर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. शिक्षणाधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या दिनांक १२-०४-२००६ च्या पत्राची प्रत देखील त्यांना प्राप्त झाली नाही असे त्यांनी पुढे आयोगास सांगितले.

अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीपैकी कर्मचारी भरतीसंबंधीच्या जाहिरातीची प्रत त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत देण्याचे मान्य केले.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी का घेतली नाही, याची कारणे उपस्थित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत. अपिलार्थीचे अपील ठरविण्याप्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अशा पध्दतीचा अवलंब करणे हे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीस धरुन नाही. त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर ज्या प्रकारे कथित निर्णय दिला आहे, यावरुन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे आयोगाचे मत आहे, त्यांच्या या वर्तनाची यथायोग्य नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तद्वतच जन अपिलीय अधिकारी यांना पुढे असेही सूचित करण्यात येते की, यापुढे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार त्यांच्याकडे दाखल होणा-या प्रथम अपिलावर त्यांनी योग्य त्या पध्दतीने सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा व अशा प्रकारची पुनरावृत्ती भविष्यात होऊ देऊ नये.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे मागितलेली माहिती देण्यास ते बांधील आहेत. तथापि अपिलार्थी हे सदर माहिती प्राप्त करुन घेण्यास स्वतः येत नसून सदर माहिती पोस्टाने पाठविण्यास सांगत असतात व त्याचबरोबर माहिती पोस्टाने पाठविली असता ते ती स्विकारत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे यावरुन असे दिसून येते की, मुळात अपिलार्थी यांच्याकडे, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केल्यासंदर्भात व सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त झाल्यासंदर्भात कोणताही पुरावा उपलब्ध नाही. याचबरोबर जन

माहिती अधिकारी यांना अपिलार्थी यांनी पोस्टाने पाठविलेला अर्ज व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी पोस्टाने पाठविलेले पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे देखिल संशयास्पद वाटत आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी आज अपूर्ण स्वरुपात देऊ केली आहे. अपिलार्थीस अपूर्ण माहिती देऊन त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे सिध्द होत आहे. तेव्हा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अर्जातील मागणीची त्वरीत दखल घेऊन त्यामध्ये मागितलेल्या "कर्मचारी नेमणूक संदर्भातील दिलेल्या जाहिरातीची प्रत" त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या प्रकरणी दोन्ही बाजुंनी त्यांच्याकडील युक्तिवाद संदर्भात आवश्यक तो पुरावा सादर न केल्याने वरील प्रमाणे आदेश अंतीम करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी दर्शविलेला आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई याची यथायोग्य नोंद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांनी घ्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती -- कर्मचारी नेमणूक संदर्भातील दिलेल्या जाहिरातीची प्रत -- हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी आणि तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १५ दिवसात सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, संपादक सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बस स्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चैतन्यनगर, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७०९

निर्णय दिनांक ०४-१२-२००७

१ श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, : अपिलार्थी
मेन रोड, निंबाळकर गल्ली,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक भूमी अभिलेख,
उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख श्री. सुधाकर दत्तोबा गवळी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख श्री. विलास गणपतराव शिरोळकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १९-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९८० ते २००५ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती माहिती मागितली होती.

“ नगरपरिषद हद्दीतील रेखांकनामधील प्लॉट विभागणी व रेखांकनासाठी जमीन क्षेत्राची पोट विभागणी संबंधी असलेल्या शासन नियमाची किंवा अटी व शर्तीची सत्यप्रत (संचालक भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य यांचे यासंबंधी निर्देश) पोट विभागणीचे अधिकार कोणत्या अधिका-याला आहेत. उदा. मुख्याधिकारी, नगररचनाकर, जिल्हाधिकारी, तहसीलदार, तालुका भूमी अभिलेख, अधीक्षक भूमी अभिलेख.”

अपिलार्थीने सदर माहिति व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस एक पत्र लिहून, सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २ इतके त्यांचे कार्यालयात दिनांक १८-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी प्रदान करण्याची सूचना दिली आहे. सदर पत्रावर जन माहिती अधिकारी कार्यालयाने कोणतीही तारीख टाकलेली नाही. तथापि पत्र क्रमांक जा. क्र. २००६ असा उल्लेख केलेला आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील जावक रजिस्टर पाहता सदर पत्र त्यांनी दिनांक १८-०२-२००६ रोजी लिहून पोस्टामध्ये दिनांक २१-०२-२००६ रोजी टाकल्याचे दिसून येते. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक २२-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती दिली नसल्याचे नमूद करुन, त्यांच्या निर्णयामध्ये त्यांनी या निर्णयाविरुध्द अपील प्राधिकरणाचा तपशील व कालावधी दिला नसल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०३-२००६ रोजी अंतीम सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक १२-०४-२००६ रोजी पारीत केले आहे. सदर अपील निर्णयामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील नामंजूर केले आहे. सदर अपील नामंजूर करताना त्यांनी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक २ च्या माहितीची मूळ अर्जात मागणी केली नव्हती व अपील केवळ तांत्रिक बाबीवर केले असल्याचे नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिका-यास दंड न लावून चुकिची कृती केली असल्याचे नमूद करुन, माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी ४ दिवसांचा विलंब लावल्याने त्यांना प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे दंड करण्याची व अपिलार्थीने मागितलेल्या मुद्दा क्रमांक २ ची माहिती देण्यासंबंधी आदेश देण्यास आयोगास विनंती केली आहे. आयोगाकडे केलेल्या या अर्जामध्ये त्यांनी अंतीमतः जन अपिलीय अधिकारी यांना अपील न फेटाळण्याची समज द्यावी व त्यांना दंडीत करुन त्यांच्याकडून झालेल्या नुकसानभरपाईची वसूली करण्याबाबतही आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांना अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ ची संदर्भिय माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही ती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी व तसेच जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिल्याने त्यांच्यावर माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० (१) प्रमाणे कारवाई व्हावी व त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी भरलेले शुल्क त्यांना परत मिळावे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, सदर प्रकरण त्यांच्या कालावधीतील नसून त्यांनी या पदाचा कार्यभार दिनांक ०७-०६-२००६ पासून स्विकारलेला आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थी यांच्या मूळ अर्जाचे अवलोकन संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी काळजीपूर्वक केलेले नाही. अपिलार्थी यांनी केलेल्या दिनांक १९-०१-२००६ रोजीच्या मूळ अर्जामध्ये त्यांनी एकूण २ मुद्दयावर माहिती मागविली होती. यातील मुद्दा क्रमांक २, " पोट विभागणीचे अधिकार कोणत्या अधिका-याला आहेत " हा आहे. जन माहिती अधिकारी यांनी ज्यावेळी अपिलार्थीस त्यांच्याकडील तारीख नसलेल्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला, त्या पत्रामध्येच अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक २ ची माहिती त्यांनी जर अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज नीट वाचला असता तर त्याचवेळी देता आली असती, तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीस माहिती देण्याचे पत्र त्यांनी जरी दिनांक १८-०२-२००६ (शनिवार) रोजी केले असले तरी त्यांनी ते प्रत्यक्षात पोस्टामध्ये दिनांक २१-०२-२००६ (मंगळवार) रोजी दाखल केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे माहितीसाठीच्या दाखल झालेल्या अर्जासंदर्भात विहित वेळेचे बंधन कसोशीने पाळण्याची जबाबदारी प्रामुख्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर होती. त्यांनी अपिलार्थीने माहिती मागितलेल्या अर्जावर माहिती ज्या दिवशी तयार होती त्याच दिवशी अगर दुस-या दिवशी पोस्टाने देणे गरजेचे होते. परंतु दुस-या दिवशी रविवार होता, त्यामुळे किमान सदर पत्र त्यांनी सोमवारी दाखल करण्यास हरकत नव्हती. क्ष्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याकरिता आवश्यक ते गांभीर्य दाखविले नसल्याचे स्पष्ट होत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याकरिता ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १८-०२-२००६ रोजी तयार करुन ठेवली होती. तथापि

सदर पत्र पोस्टात टाकण्याकरिता त्यांना ३ दिवसांचा कालावधी का लागला व या विलंबास जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर अधिक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर या माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भात काहीही भाष्य केलेले नाही. यावरुन त्यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. त्यांनी केलेल्या अशा प्रकारच्या वर्तनातून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट होत आहे. त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीचे अपील ठरवितांना त्यांचा प्रथम माहितीचा अर्ज नीट वाचला नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीचे अपील नामंजूर करण्याची त्यांची कारणे आयोगास मान्य नाहीत. कारण अपिलार्थीने केवळ तांत्रिक बाबीवर अपील अर्ज केला होता व ही बाब नैसर्गिक न्यायतत्वाचे विरुध्द असल्याने त्यांचे अपील अमान्य करण्याची त्यांची कारवाई बरोबर नाही. अपिलार्थीने केलेल्या अपिलामध्ये नैसर्गिक न्यायतत्वाचा कोणत्याही प्रकारे भंग होत असल्याचे आयोगास दिसून येत नाही. त्याचबरोबर अपिलार्थीकडून आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन देखील अपिलार्थीस, जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिली. अपिलार्थी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांना अपिले न फेटाळण्याची समज द्यावी अशी विनंती राज्य माहिती आयोगाकडे केली आहे. ती बरोबर नाही कारण जन अपिलीय अधिकारी हे स्वतः अर्धन्यायिक प्राधिकरण असून त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या अपील अर्जावर ते त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन स्वतंत्रपणे निर्णय घेण्यास प्राधिकृत आहेत. त्यांनी घेतलेल्या निर्णयास ते व्यक्तिशः जबाबदार असतात त्यामुळे अपिलार्थीची ही मागणी आयोग अमान्य करत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली मुद्दा क्रमांक २ ची वर उध्दृत केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच २

दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीचे सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी जमा केलेले शुल्क रुपये २ हे त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच २ दिवसाच्या आत अपिलार्थीस परत करावे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जासंबंधात दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी भविष्यात त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार प्राप्त होणा-या अर्जावर विहित मुदतीत सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी जमा केलेले शुल्क रुपये २ हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच २ दिवसाच्या आत परत करावेत.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या मुद्दा क्रमांक २ ची माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ दिवसाच्या आत त्यांना विनामूल्य पुरवावी.

४. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे याची नोंद अधीक्षक भूमी अभिलेख उस्मानाबाद यांनी घ्यावी.

५. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचे दिनांक १८-०२-२००६ रोजी तयार करुन ठेवलेले माहितीचे पत्र पोस्टात टाकण्याकरिता ३ दिवसांचा

कालावधी लागला त्या विलंबास जे कर्मचारी जबाबदार आहेत त्यांच्यावर अधिक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, मेन रोड, निंबाळकर गल्ली, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७१०

निर्णय दिनांक ०४-१२-२००७

१ श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, : अपिलार्थी
मु. पो. नृसिंह कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, गंगापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विलास त्रिंबकराव भालेराव हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार सौ. सविता चौधर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. पिराजी लक्ष्मण सोरमारे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन १९९५ ते २००० या कालावधीतील गंगापूर शहरातील झुणका भाकर केंद्रासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" गंगापूर शहरात किती झुणका भाकर केंद्रे आहेत, ती कोणाच्या नांवाने आहेत, त्यांची संपूर्ण नांव, झुणका भाकर केंद्रासाठी किती जागा दिली व बांधकामासाठी किती अनुदान दिले तसेच शासनाची जागा दिल्याबाबतची ऑर्डर प्रत, नकाशा चतु:सीमेसह मिळणेबाबत."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती. तसेच ते दारिद्र रेषेखालील असल्याचे या अर्जामध्ये त्यांनी नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये काही माहिती देऊन उर्वरीत माहिती त्यांच्या कार्यालयात देण्यात येणार असल्याचे या पत्राव्दारे सूचित केले आहे. तथापि अपिलार्थीस सदर पत्र प्राप्त झाले किंवा कसे याबाबत साशंकता व्यक्त करण्यात येत आहे, कारण जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपिलार्थीस मिळण्यापुष्ट्यर्थ त्या कोणताही पुरावा आयोगासमोर सादर करु शकल्या नाहीत. ही माहिती मिळाल्यापुष्ट्यर्थ अपिलार्थीने त्यांच्याकडील स्थळप्रतीवर सही केली असल्याचे त्यांनी आयोगासमोर सांगितले. याबाबत अपिलार्थीची ही सही व अपिलार्थीने माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अर्जावरील सही या दोन्ही सह्या पूर्णपणे भिन्न असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी लिहिलेले दिनांक २५-०१-२००६ रोजीचे त्यांचे पत्र प्राप्त झाले किंवा कसे हे कळण्यास आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन, व अपिलार्थी आज गैरहजर असल्यामुळे कळण्यास मार्ग नाही.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीप्रमाणे, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०६-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती न देऊन माहिती देण्यास

टाळाटाळ केली असल्याचे नमूद केले आहे व त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे शास्ती लावण्याची जन अपिलीय अधिकारी यांना अपील अर्जामध्ये पुढे विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी, कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देऊन त्याचा अनुपालन अहवाल त्यांच्या कार्यालयास पाठवावा व वेळेचे बंधन पाळवे असे सूचित केले. या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिलेली दिसते.

जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीस कळवूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या संदर्भातील कोणतीही माहिती दिली नाही म्हणून त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक १२-०५-२००६ रोजी परत या संदर्भात एक स्मरणपत्र दिले. अपिलार्थीच्या या दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या अर्जाच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याने व व्दितीय अपिलाची मुदत संपत आली असल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात आली आहे. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे जे लेखी म्हणणे मांडले आहे, तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेऊन, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर त्यांनी विहित

मुदतीत माहिती न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती त्यांच्याकडील दिनांक २५-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये दिलेली आहे. याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने त्यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे उर्वरीत माहिती त्यांच्या दिनाक १३-०७-२००६ रोजीच्या पत्रान्वये मागितली होती. जन माहिती अधिकारी यांच्याकडील या पत्रावर जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी तत्कालीन लिपीकाला नोटीस बजावली असून या नोटीसची एक प्रत जन माहिती अधिकारी यांना दिलेली आहे. या पत्रामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना असे सूचित केले आहे की, झुणका भाकर केंद्राचा विषय त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी मागणी केलेली कागदपत्रे ही त्यांच्याच कार्यालयात उपलब्ध असणार. त्यामुळे सदर माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात शोधावी. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या पत्रान्वये माहिती दिल्याचे आयोगासमोर त्यांनी सांगितले. अपिलार्थीस सदर माहिती मिळाल्याप्रीत्यर्थ त्यांनी त्यांच्याकडील कार्यालयीन पत्राची मूळ प्रत दाखविली. या मूळ प्रतीवर जन माहिती अधिकारी यांची सही नसून, अपिलार्थीस माहिती मिळाल्याबाबतची ०२-१२-२००७ ची पोहोच आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व वरील घटनाक्रम पाहता या प्रकरणी अपिलार्थीस निश्चितपणे विहित मुदतीत संपूर्ण माहिती मिळाली नसल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये केला असता त्यांना सर्वसाधारण

परिस्थितीत ही माहिती दिनांक ०१-०२-२००६ रोजी अगर तत्पूर्वी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार मिळणे अपेक्षित होते. तथापि या मुदतीमध्ये अपिलार्थीस त्यांनी केलेल्या मूळ अर्जासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न करुन माहिती अधिकार अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीस माहिती दिल्याचे जे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी दिले आहे ते स्विकृत करण्यामध्ये देखील आयोगाचा वर नमूद केल्याप्रमाणे आक्षेप आहे. या आक्षेपाची पुर्तता जन माहिती अधिकारी आजच्या सुनावणीमध्ये करु शकले नाहीत. याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील या प्रकरणी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीच्या मागणीकडे निःसंशयपणे दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही माहिती अधिकारी यांनी त्यांना कोणत्याही प्रकारे माहिती न दिल्याने त्यांना माहितीसाठी आयोगाकडे व्दितीय अपिलाव्दारे धाव घ्यावी लागली. त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-१२-२००७ रोजी अपिलार्थीस माहिती दिली. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी १ वर्ष १० महिने इतका विलंब लावल्याचे या प्रकरणी दिसून येत आहे. विलंबाचा कालावधी पाहता या विलंबाचे कोणतेही कारण समर्थनीय ठरु शकणार नाही असे आयोगाचे मत आहे. या विलंबाप्रीत्यर्थ उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्याकडे जेवढी माहिती उपलब्ध होती तेवढी त्यांनी अपिलार्थीस दिली. तथापि नंतर सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात शोध घेऊन अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०१-१२-२००७ रोजी दिलेली आहे. राज्य शासनाच्या झुणका भाकर केंद्र योजनेमध्ये खाजगी व्यक्तिंना काही विशिष्ट क्षेत्राची शासनाच्या मालकीची जागा विशिष्ट कालावधीकरिता झुणका भाकर केंद्र चालविण्यासाठी देण्यात येत होती. संबंधीत प्रश्न हा जागेसंबंधी असल्यामुळे व जागेसंबधी सर्व अभिलेखे हे शासनाच्या ''अ'' प्रवर्गात मोडत असल्याने

कोणत्याही परिस्थितीत हे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्याकडे असणे अभिप्रेत आहे. या कारणास्तव तात्पूरत्या भाड्याने दिलेल्या जागेचे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाहीत हा जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती न देऊन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा निःसंशयपणे भंग केला आहे. तसेच त्यांनी आपल्या या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा वरील प्रमाणे सिध्द केला आहे. तेव्हा संबंधीत जन माहिती अधिकारी या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यास पात्र ठरत आहेत. तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, सचिव, (महसूल) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी त्यांनी वरील प्रमाणे दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर १ महिन्याच्या आत पाठवावा. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आता माहिती दिली असल्याने व सदर माहिती अपिलार्थीस दिनांक ०१-१२-२००७ रोजी प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव, (महसूल) यांनी, संबंधीत जन माहिती अधिकारी त्यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेजबाबदारपणाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३ महिन्याच्या आत करावी व तदनंतर एक महिन्याच्या आत आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विलास त्रिंबकराव भालेराव, मु. पो. नृसिंह कॉलनी, गंगापूर, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७११

निर्णय दिनांक ०४-१२-२००७

१ श्री. मळभागे उमाकांत रामलिंगप्पा, : अपिलार्थी
स. शि. जि. प. प्रशाला (मुलांची), चाकूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, लातूर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मळभागे उमाकांत रामलिंगप्पा, जन

माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जुलै १९९३ ते दिनांक १०-११-२००५ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या, वेतनश्रेणीसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे दिलेल्या निर्णयासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " माध्यमिक शिक्षक म्हणून न्यायालय (उच्च) खंडपीठ औरंगाबाद येथे मान्य केलेप्रमाणे."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद खालील प्रमाणे दिला आहे.

" संदर्भिय अर्जाव्दारे आपण केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली माध्यमिक शिक्षक वेतनश्रेणी रुपये ५५००-९००० मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपण केलेली मागणी सेवाविषयक असून आपण कुठल्याही कागदपत्रांची मागणी केलेली नाही त्यामुळे आपणास माहिती देता येत नाही. "

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, मिळालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०१-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २१-०१-२००६ रोजीचे पत्र दिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ०९-१२-२००५ च्या पत्रातील मजकुराचा

पुनरुच्चार केला असून, अपिलार्थीने केलेले अपील हे शिस्तीस धरुन नाही असे अपिलार्थीच्या निदर्शनास आणले आहे व त्याचबरोबर अपिलार्थी यांना यापुढे विनाकारण पत्रव्यवहार न करण्याची सूचना देऊन तो केल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याचा इशारा देखील अपिलार्थीस दिला आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज रोजी झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे तिघेही हजर नाहीत. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. तथापि अपिलार्थीने सर्व संबंधितांकडे केलेला पत्रव्यवहार व आयोगास उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीस त्यांच्या सुधारीत वेतनश्रेणी संदर्भात काही माहिती हवी असल्याचे दिसून येते. तथापि निश्चितपणे कोणती माहिती त्यांना हवी आहे याचा त्यांनी काहीही उल्लेख केलेला नाही. त्यांनी आयोगाकडे केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या, विभागीय आयुक्त यांच्याकडे केलेल्या अर्जावरुन असे दिसून येते की, ते सध्या १४०० ते २६०० या वेतनश्रेणीमध्ये कार्यरत असून त्यांना १२५ रुपये इतके जास्तीचे मानधन मिळत आहे. ते आकरावी व बारावीच्या वर्गांना शिकवीत असून त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ५५०० ते ९००० ही वेतनश्रेणी मिळण्यास ते पात्र असूनही त्यांच्या अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी हे कोणताही निर्णय घेत नाहीत. अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियमाव्दारे केलेले विविध अर्ज व अपिलामध्ये आपल्या माहितीचे स्वरुप निश्चितपणे

स्पष्ट केले नसले तरी त्यांना त्यांची वेतनश्रेणी सुधारुन मिळावी असे त्यांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केलेल्या पत्रव्यवहारावरुन दिसून येते.

तेव्हा आयोगास प्राधिकृत करण्यात आलेल्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (ब) मधील तरतुदीस अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीच्या या प्रकरणासंदर्भात त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा.

अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारच्या विशिष्ट माहितीची मागणी केली नाही. त्यामुळे त्यांचे अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या वेतननिश्चिती-संदर्भात त्यांचेकडे केलेल्या अर्जावर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २ महिन्याच्या आत निर्णय घ्यावा

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मळभागे उमाकांत रामलिंगप्पा, स. शि. जि. प. प्रशाला (मुलांची), चाकूर, जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५५

निर्णय दिनांक ०४-१२-२००७

१ श्री. जव्हेरी मनोजकुमार मदनलाल, : अपिलार्थी
प्लॉट नं. ४३, माध्यमिक शिक्षक कॉलनी,
नंदूरबार, जिल्हा नंदूरबार

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक
कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपसंचालक शिक्षण प्रादेशिक कार्यालय
(मा.) विभाग एल. आय. सी. ऑफिस जवळ,
नाशिक

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : विज्ञान सल्लागार, शिक्षण उपसंचालक कार्यालय
नाशिक विभाग नाशिक

जन अपिलीय अधिकारी : शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. जव्हेरी मनोजकुमार मदनलाल यांच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. शैलेंद्र मदनलाल जोहरी, जन माहिती अधिकारी तथा विज्ञान सल्लागार, शिक्षण उपसंचालक कार्यालय श्री. सुरेश रामकृष्ण पाठक (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत तर जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०५-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००४ या कालावधीशी संबंधीत असलेली खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

> " आपले पत्र क्र. शि/३/माध्य/२/चौकशी/२००३/६०५, दिनांक ०६-०१-२००४ या पत्रान्वये झालेल्या चौकशी प्रत."

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस चौकशीचा विषय व त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे याबाबत अर्जात स्पष्टपणे नमूद करण्याचे सूचित केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०२-२००६ रोजी साध्या पत्रावर अर्ज करुन त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची मागणी कायम ठेवली आहे व याच पत्रामध्ये त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांनी मूळ अर्जाव्दारे अपेक्षित केलेल्या नकला त्यांना पाठविता येणे त्यांना शक्य नसेल तर तसा खुलासा अपिलार्थीस पाठविण्याबाबत त्यांनी या पत्रामध्ये विनंती केली आहे. येथे असे लक्षात येते की, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केल्याचे काहीही नमूद केले नसून, त्यांची मागणी एका लेखी अर्जाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केली आहे. या पत्रावर त्यांनी ५ रुपये इतक्या किंमतीचा कोर्ट स्टॅम्प चिकटविला आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीन्वये अपील करावयाचे असल्यावर त्यावर २० रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प त्यांनी लावणे आवश्यक असतांना या प्रकरणी त्यांनी फक्त ५ रुपये किंमतीचे स्टॅम्प लावल्याचे दिसून येते. अपिलार्थीच्या या चुकिच्या कृतीमुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांचेकडे केलेले दिनांक ०४-०२-२००६ चे कथित अपिल अवैध ठरत आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास उद्देशून जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले असून, अपिलार्थीने अपेक्षित केलेला चौकशी अहवाल त्यांच्याकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्याकडून प्राप्त

झाला नसल्याचे कळविले व याचबरोबर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदूरबार यांना या प्रकरणी (अहवाल पाठविण्यासंदर्भात) कळविले असल्याचे देखील अपिलार्थीस पाठविलेल्या या पत्रात नमूद केले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाचे अवलोकन करता, अपिलार्थीस अद्यापही त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आवश्यक असल्याचे दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपिलामध्ये त्यांचे जे म्हणणे मांडले आहे, तोच त्यांचा युक्तिवाद आहे असे समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. तथापि संबंधीत चौकशी अहवाल त्यांच्याकडे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्याकडून उपलब्ध झाल्यावर तो ८ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात येईल. याहून त्यांना जास्त काहीही सांगावयाचे नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे केला गेलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीमध्ये प्रथम प्रतिसाद दिलेला आहे. अपिलार्थीने सर्व प्रथम जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मिळविण्यासाठी केलेल्या अर्जाचे अवलोकन करता असे दिसून येईल की, अपिलार्थीस निश्चितपणे कोणती माहिती हवी आहे याचा बोध या पत्रावरुन होत नाही. तथापि शिक्षण

उपसंचालक यांचे कार्यालयातील दिनांक ०६-०१-२००४ च्या पत्रातील आदेशान्वये झालेल्या चौकशी अहवालाची प्रत त्यांना हवी असावी असे अनुमान काढता येईल. अपिलार्थीने मूळ माहितीच्या अर्जात त्यांना कोणती माहिती हवी आहे याचा स्पष्टपणे उल्लेख केला नसल्याने, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीमध्ये दिलेले उत्तर योग्य आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले उत्तर, जर अपिलार्थीस मान्य नव्हते तर त्यांनी या प्रकरणी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९ (१) प्रमाणे २० रुपयाचे कोर्ट स्टॅम्प चिकटून विहित नमुन्यात अर्ज करावयास हवा होता. तथापि अपिलार्थीने अशा प्रकारची कोणतीही कृती न करुन एका साध्या कागदावर एक अर्ज लिहिला आहे व त्यावर ५ रुपये इतक्या किंमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटविले आहे. अपिलार्थीची ही कृती चुकिची आहे. अपिलार्थीने २० रुपये इतक्या किंमतीचा कोर्ट स्टॅम्प या अर्जावर लावून व ज्या निर्णयाविरुध्द जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील केले आहे त्या निर्णयाची प्रत या अर्जासोबत जोडून हे अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे आवश्यक होते. तथापि अपिलार्थीने अशा पध्दतीचा अवलंब या प्रकरणी केलेला नाही. अपिलार्थीच्या या अर्जास देखील जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले असून, त्यांच्याकडे त्यावेळेपर्यत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदूरबार यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाला नसल्याने तो अपिलार्थीस देता येणे शक्य झाले नसल्याचे या पत्रामध्ये त्यांनी कळविले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध झाल्यावर ती अपिलार्थीस तात्काळ पुरविण्यात येईल असे अपिलार्थीस या पत्रामध्ये त्यांनी आश्वासीत देखील केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलामध्ये, आवश्यक असलेल्या माहितीचा संदर्भ म्हणून त्यांनी मूळ माहितीसाठी केलेला अर्ज जोडला आहे हे पाहता, आयोगास देखील अपिलार्थीस नक्की कोणती माहिती हवी आहे

याचा बोध होत नाही. तथापि अपिलार्थीस शिक्षण उपसंचालकांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नंदूरबार यांना दिनांक ०६-०१-२००४ च्या पत्रान्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे करण्यात आलेल्या चौकशीच्या अहवालाची प्रत हवी असल्याचे अनुमान काढता येते.

शिक्षण उपसंचालकांनी दिनांक ०६-०१-२००४ रोजी चौकशी आदेश देऊनही आजतागायत म्हणजे ३ वर्षे १० महिने इतका प्रदीर्घ कालावधी व्यापगत झाल्यानंतरही संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नंदूरबार यांच्याकडून साधी चौकशी केली असल्याचे अथवा या संदर्भात त्यांनी शिक्षण उपसंचालकाकडे कळविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. शिक्षण खात्याच्या क्षेत्रीय कार्यालयामध्ये प्रशासन कशा प्रकारे काम करत आहे याचे हे उदाहरण म्हणजे मुर्तीमंत नमुना ठरावा असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता असे आढळून आले की, नंदूरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यामधील जीवन विकास माध्यमिक विद्यालय बोरचक या शाळेमध्ये अपिलार्थी कार्यरत होते. तथापि अपिलार्थी यांना सदर शिक्षण संस्थेने नोकरीवरुन कमी करुन, श्री. भामरे यांना १९९३ ते जुलै १९९७ पर्यत ते कामावर नसतांना देखील ते कामावर आहे असे दाखवून त्यांना सेवाजेष्ठता दिली आहे, व मुख्याध्यापक पदी त्यांची नियुक्ती करुन त्यांना त्या पदाची वेतनश्रेणी सुध्दा दिली आहे. तद्वतच अपिलार्थी यांना ते १९९३ पासून या शाळेत कार्यरत असतांना, त्यांना १९९६-९७ पासून नियमीत पगारापासून वंचित ठेवले असल्याचे अपिलार्थी यांची तक्रार आहे. या तक्रारीसंदर्भात शिक्षण उपसंचालकाकडून, त्यांच्याकडील दिनांक ०६-०१-२००४ च्या पत्राव्दारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नंदूरबार यांना या संस्थेची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाप्रमाणे शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयात प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची

प्रत अपिलार्थी यांना हवी आहे.  परंतु सदर चौकशी अहवालाची प्रत, शिक्षण उपसंचालक यांचे कार्यालयात, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नंदूरबार यांच्याकडून अद्यापपर्यंत प्राप्त न होऊ शकल्यामुळे, ते ही माहिती अपिलार्थीस आजपर्यंत पुरवू शकले नाहीत.

आजच्या सुनावणीमध्ये, प्रभारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नंदूरबार श्री. राहूल चौधरी हजर आहेत.  त्यांनी आयोगासमोर आपले म्हणणे सादर करतांना आयोगास असे सांगितले की, सदर चौकशी अहवाल त्यांनी आता पूर्ण केला असून तो अद्याप शिक्षण उपसंचालक नाशिक यांना सादर केला नाही.  सदर अहवाल ते येत्या २ ते ३ दिवसात शिक्षण उपसंचालक यांना सादर करणार आहेत.  शिक्षण उपसंचालक कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नंदूरबार यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर तो ७ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरविण्यात येईल.  हा घटनाक्रम व युक्तिवाद पाहता असे दिसून येईल की, येत्या ७ दिवसाच्या आत शिक्षण उप संचालक यांचे कार्यालयात अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती म्हणजे चौकशी अहवाल उपलब्ध होणार आहे.  त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती आता आवश्यक असेल तर त्यांनी या माहितीसाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार पुनश्च अर्ज करावा.

अपिलार्थीने केलेले प्रथम अपील चुकिच्या पध्दतीने केले असल्यामुळे व ते वर वर्णिल्याप्रमाणे अवैध ठरत असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील हे तांत्रिक मुद्दयावर फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जव्हेरी मनोजकुमार मदनलाल, प्लॉट नं. ४३, माध्यमिक शिक्षक कॉलनी, नंदूरबार, जिल्हा नंदूरबार

२ जन माहिती अधिकारी तथा विज्ञान सल्लागार, शिक्षण उपसंचालक कार्यालय नाशिक विभाग नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७१२

निर्णय दिनांक ०५-१२-२००७

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, : अपिलार्थी

रा. भक्तीनगर, कंधार, तालुका कंधार,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. उपविभाग,
शिरुर तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. विभाग
उदगीर,
जिल्हा लातूर

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहाय्यक अभियंता, उपविभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. (मर्या.) शिरुर (ताजबंद), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण, उदगीर, तालुका उदगीर जिल्हा लातूर

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बाबू नामदेव गबाळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, उपविभागीय कार्यालय श्री. गोविंद साहेबराव बोयणे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण श्री. सुंदर शामराव लटपटे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील विविध कामासंदर्भात व आस्थापनाविषयक एकूण २९ मुद्दयावर काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये -- लाईनमनच्या बदल्यापासून कनिष्ठ अभियंता आणि सहाय्यक अभियंता यांची कर्तव्ये, मीटर भाडे वीज बिलात घेण्यात येत नाही. त्यांच्याकडे केलेल्या तक्रारीचा निकाल किती दिवसात देण्यात येतो, वीज वाहिन्यांची देखभाल व दुरुस्तीबाबत, मीटर संदर्भात इतर मुद्दे -- इत्यादी माहितीचा समावेश होता.

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००५ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. यामध्ये त्यांनी अपिलार्थीस, सदर माहिती २००० पृष्ठांची असून प्रती पृष्ठ २ रुपयाप्रमाणे रुपये ४००० /- इतक्या रकमेचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले.

सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पोस्टाने पाठविले असल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. तथापि अपिलार्थीस हे पत्र पाठविण्याबद्दल कोणताही पुरावा त्यांनी आयोगास सादर केला नाही. अपिलार्थीने सदर पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे आयोगासमोरील सुनावणीमध्ये सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्या कडील दिनांक ०४-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील नामंजूर केल्याचे अपिलार्थीस कळविले. अपिलार्थीचा अपील अर्ज नामंजूर करतांना

त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविल्याप्रमाणे आवश्यक ते शुल्क रुपये ४००० /- जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्यामुळे सदर अपील नामंजूर करण्यात येत असल्याचे कळविले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपिलावर कोणतीही सुनावणी न घेता, अपिलार्थीस कळविण्याची त्यांची कृती अपील ठरविण्याच्या कृतीशी विसंगत आहे. त्यांनी या प्रकरणी जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून त्यावर आपला निर्णय देणे या प्रकरणात अभिप्रेत होते, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात अशी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी अपील सुनावणी न घेताच त्यांचे अपील नियमबाह्य निकाली काढले असे आयोगास स्पष्ट केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-०१-२००६ रोजी फी भरण्याच्या तयारीसह गेले असता, सदर माहिती तयार नाही, माहितीची किती पाने लागतात माहित नाही असे संबंधितांनी त्यांना सांगून, त्यांच्याकडील फीचा भरणा न करुन घेताच त्यांना परत पाठविले व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांना सुनावणीची नोटीस पाठविली नाही, आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही व बिना सुनावणी अपील अर्ज नामंजूर करुन त्यांचा अपील अर्ज निकाली काढला. या घडामोडीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी मागितलेली माहिती जाणुन-बुजून वाईट हेतुने त्यांना दिली नाही.

दिनांक १६-०१-२००६ रोजी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास त्यांनी लेखी पत्र लिहून माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी ते आवश्यक ते शुल्क भरण्यास तयार असल्याचे या पत्राव्दारे कळविले होते. म्हणून त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे रुपये २५००० /- इतकी शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे. तद्वतच जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी आपसात संगनमत करुन त्यांना मानसिक त्रास दिल्याचे देखील शेवटी या अपील अर्जात म्हटले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक १५-१२-२००५ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३१-१२-२००५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या संदर्भातील त्यांच्याकडील आवक जावक रजिस्टरच्या प्रती त्यांनी आज त्यांच्याबरोबर आणल्या नाहीत. अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात दिनांक १६-०१-२००६ रोजी उपस्थित होते. तथापि त्यांच्याकडील थकीत वीज बील भरण्यासाठी ते दिनांक १६-०१-२००६ रोजी त्यांच्या कार्यालयात हजर होते असे त्यांचे म्हणणे आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व वरील घटनाक्रम पाहता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही मोठ्या व विस्तृत व्याप्तीची आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये ब-याच ठिकाणी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत प्रतिसाद दिला असे जरी म्हटले असले तरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ३१-१२-२००५ रोजी पत्र पाठविले हे त्यांचे म्हणणे ते योग्य त्या पुराव्याअभावी आयोगासमोर सिध्द करु शकले नाहीत. आयोगाने त्यांना आवक जावक रजिस्टरच्या प्रती सुनावणीच्या वेळेस उपलब्ध करुन देण्याविषयी सूचित केले असतांना

देखील त्यांनी आज आयोगासमोर कोणताही ठोस पुरावा सादर केलेला नाही ही बाब येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे.

वरील बाबींचे अवलोकन करता व जन माहिती अधिकारी यांना, त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचे, पुराव्यासह सिध्द न करता आल्यामुळे असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या प्रथम अर्जावर विहित मुदतीत प्रतिसाद दिल्याचा ठोस पुरावा जन माहिती अधिकारी यांना सादर न करता आल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस मोफत पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीस माहिती न देण्यामागे कोणताही असद्‌हेतू न आढळून आल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लावण्याचे आदेश आयोग देत नाही. तथापि येथून पुढे भविष्यात त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींची अंमलबजावणी करतांना विशेष सतर्क राहावे अशी त्यांना आयोगातर्फे समज देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी भविष्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदींची अंमलबजावणी करतांना सतर्क राहावे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाबू नामदेव गबाळे, रा. भक्तीनगर, कंधार, तालुका कंधार, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, उपविभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. (मर्या.) शिरुर (ताजबंद), तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय, महावितरण, उदगीर, तालुका उदगीर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४९

निर्णय दिनांक ०५-१२-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे,<br>सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,<br>तालुका शाखा मुखेड,<br>व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन,<br>मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मेथी,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती<br>कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय मेथी व जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २८-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००५ ते २००६ मार्च या कालावधीतील ग्रामपंचायतच्या कारभारासंदर्भात काही माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“ १. सर्व ग्रामसभेच्या ठरावाची संक्षिप्त प्रत देणे, घरपट्टी किती जमा झाली किती बाकी आहे. आजपर्यंत आपल्या ग्रामपंचायतीस कोणकोणत्या योजनेतून किती किती निधी प्राप्त झाला त्याचा संपूर्ण तपशील देणे, घरकूल किती आले, दिलेल्या सभासदाचे नांवे. समाजमंदिर व अंगणवाडी हे आपल्या गावात बांधण्यात आलेले आहेत ते ग्रामपंचायतीस रितसररित्या वर्ग करण्यात आलेले काय ? असल्यास त्यांचा उपयोग कशासाठी करता ? सद्यस्थित समाजमंदिर व अंगणवाडीस ग्रामपंचायतीचे कुलूप आहे काय, नसल्यास दुसरे कोणाचे आहे त्याचे नाव संपूर्ण पत्त्यासह देणे.”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या प्रथम अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या या अर्जासंदर्भात विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद मिळाला नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील करण्याचे कारण म्हणून जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही असे या अपील अर्जात अपिलार्थीने नमूद केले आहे. सदर अपील अर्ज देखील जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक १०-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या प्रथम अपिलाच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तथापि अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००६ रोजीच्या अपील अर्जाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या पत्रानुसार जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले आहे व त्यांच्या या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील ठरविण्याची ही पध्दत पूर्णतः चुकिची असून, गट विकास अधिका-यासारख्या अधिका-याने अपिलार्थीच्या अपील अर्जावर विहित पध्दतीचा अवलंब न करता त्याचा निपटारा जन माहिती अधिका-यास पत्र देऊन करावा याचे आयोगास सखेद आश्चर्य वाटते. गट विकास अधिका-याचा दर्जा असलेल्या अधिका-यास, अपील कसे ठरवावे हे आयोगाने शिकविण्याची गरज नाही. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या अपिलाची बोळवण ज्या पध्दतीने केली आहे ती पाहता त्यांनी अपिलार्थीचे अपील ठरविण्याची जबाबदारी टाळून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई सिध्द केली आहे असे आयोगाचे मत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलातील केलेली विधाने हाच त्यांचा युक्तिवाद समजून या अपिलावर पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीचे अपील दिनांक २८-०२-२००६ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस, त्यांनी प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, दिनांक ३०-०३-२००६ रोजी अगर तत्पूर्वी देणे अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती किंवा अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात त्यांच्याशी माहिती देण्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. आज देखील आयोगाच्या सुनावणीस ते वेळेवर सूचना देऊन देखील अनुपस्थित राहिले आहेत. त्यांची अनुपस्थिती व वरील कृतीतून त्यांनी आयोगाप्रती त्यांच्या मनात असलेला अनादर स्पष्ट केला आहे असे आयोगाचे मत आहे. त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस स्वतःहून माहिती तर दिली नाहीच परंतु जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्याकडील दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे आदेश होऊन देखील त्यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती दिली नाही, अथवा यासंबंधात अपिलार्थी यांच्याशी पत्रव्यवहार केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांच्या वर्तनावर वरीलप्रमाणे आयोगाचे अभिप्राय दिले आहेत. एकूणच, या प्रकरणी हे प्रकरण जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अत्यंत बेजबाबदारपणे व बेपर्वाइने हाताळल्याचे अशा प्रकारे सिध्द होत आहे. त्यांच्या या कृतीव्दारे त्यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन निःसंशयपणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्याचे स्पष्ट होत असल्याने व त्यांनी त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्यपरायणतेचा अभाव व बेपर्वाई वरील प्रमाणे सिध्द केल्याने ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे आयोगाचे मत आहे.

तेव्हा असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी लोटल्यानंतरही अद्यापपर्यत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. तद्वतच त्यांनी त्यांच्या कार्यशैलीमधील वरील प्रमाणे दर्शविलेला कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थी यांना माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी लोटल्यानंतरही अद्यापपर्यत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त ) इतकी

शास्ती का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेला त्यांच्या कायशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन आपला अनुपालन अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन महिन्याच्या आत आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, तालुका शाखा मुखेड, व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन, मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मेथी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५०

निर्णय दिनांक ०५-१२-२००७

१ श्री. केशवराव कोंडबाराव लोखंडे, : अपिलार्थी
जि.प. प्रशालेच्या मागे, शास्त्रीनगर,
मु. पो. तालुका कळमनुरी,
जिल्हा हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा विशेष भूसंपादन अधिकारी,
अपर पेनगंगा प्रकल्प, पूसद,
जिल्हा यवतमाळ,

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. केशवराव कोंडबाराव लोखंडे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, अपर पेनगंगा प्रकल्प श्री. ब्रिजलाल हिरामण बिबे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी विशेष भूसंपादन अधिकारी, अपर पेनगंगा प्रकल्प श्री. ब्रिजलाल हिरामण बिबे हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९८८ ते ९० या कालावधीतील भूसंपादन कायदा कलम २८ (अ) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेल्या वाढीव मोबदल्यासंदर्भात खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ १. मौजे गौळ मांजरी तालुका पूसद येथील भूसंपादन कलम २८ (अ) मधील तरतुदीनुसार अनुज्ञेय असलेला वाढीव मोबदला श्री. दत्ता ग्यानू कांबळे तर्फे वाय. डी. शिंदे यांचे निवेदन दिनांक २३ जून १९९०, या निवेदनासोबत शासन परिपत्रक महसूल व वन विभाग क्र. एसक्यूएन-१०८८/(४३९२ ) महसूल व वन विभाग मंत्रालय मुंबई – ४०० ०३२ दिनांक १६-०८-१९९०, नं. २ दिनांक ०४ नोव्हेंबर १९८९ मधील आदेशानुसार कार्यवाही करावी व परिपुर्ती अहवाल शासनास पाठवावा. तसेच याच निवेदनासोबत दिनांक ०४ नोव्हेंबर १९८९ च्या शासन निर्णयाची परिपत्रकाची प्रत सोबत जोडली होती. ”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन, अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीनुसार सदर माहिती पुरविण्यापोटी लागणारे शुल्क रुपये २ त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे अपिलार्थीस सूचित केले आहे. या पत्रामध्ये त्यांनी सदर शुल्क कशा पध्दतीने भरावयाचे याचे मार्गदर्शनही अपिलार्थीस केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त होऊनही अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यासाठीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या या अपिलासंदर्भात त्यांच्याकडील दिनांक ०२-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी त्यांच्या अपील अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे अपुरी असल्याचे नमूद करुन, या त्रुटींची पुर्तता करुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात अपील परत सादर केल्यास, तात्काळ कारवाई करण्याचे अपिलार्थीस आश्वासीत केले व त्याचबरोबर या पत्राची प्रत त्यांनी जन माहिती अधिकारी यांना देऊन त्यांना अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती तात्काळ पुरविण्याचे आदेशीत केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-१०-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन ही माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी आवश्यक ते शुल्क रुपये २, पोस्टाचा खर्च रुपये २५, असे एकूण रुपये २७ ची मनीऑर्डर पावती क्रमांक

१८०६, दिनांक २४-०४-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांना पाठविल्याचे म्हटले आहे. तसेच या अपिल अर्जासोबत त्यांनी मनीऑर्डरची पावती जोडली आहे असे म्हटले आहे. तथापि सदर पावती आयोगाकडे सादर केलेल्या अर्जासोबत जोडली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात मांडलेले म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून या अपिलावर पुढे सुनावणी घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीचा दिनांक ०४-०४-२००६ रोजीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये दिनांक १५-०४-२००६ रोजी अपिलार्थीने मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यापोटीचे शुल्क रुपये २ त्यांचे कार्यालयात भरणा करण्याविषयी सूचित केले आहे. सदर शुल्क कशा प्रकारे भरावे याचे मार्गदर्शनही त्यांनी अपिलार्थीस या पत्रामध्ये केले आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क रुपये २७ त्यांचे कार्यालयाकडे मनीऑर्डरने पाठविले हे अपिलार्थीचे म्हणणे असत्य आहे. त्यांच्या कार्यालयात अपिलार्थीने सदर माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी कोणतेही शुल्क प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे भरलेले नाही. अपिलार्थीने सदर शुल्क त्यांच्या कार्यालयात भरल्यास अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एका दिवसात देण्यास ते तयार आहेत.

महसूल व वन विभागाच्या, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम माहितीसाठीच्या अर्जात संदर्भ केलेल्या दिनांक १६-०७-१९९० च्या पत्रासंदर्भात खुलासा करतांना त्यांनी असे सांगितले की, सदर पत्रासोबत कोणतेही सहपत्र त्यांना प्राप्त झाले नाही.

जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे पाठविलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये असे स्पष्ट केले आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणती माहिती मागविली होती त्याचा बोध होण्याकरिता जोडपत्र-अ ची प्रत त्यांनी अपिलार्थीकडून त्यांच्या कार्यालयाचे पत्र ०२ ऑगस्ट २००६ रोजीच्या पत्रान्वये मागितली होती. तथापि अपिलार्थीने जोडपत्र-अ ची प्रत त्यांच्या कार्यालयास सादर केली नाही. अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या दिनांक २४-०७-२००६ रोजीच्या अपील अर्जासोबत मूळ माहितीचा अर्ज सादर केलेला नाही तरीही त्यांनी जन माहिती अधिका-यास ०२ ऑगस्ट २००६ च्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती त्यांना पुरविण्याचे निर्देशीत केले आहे. थोडक्यात अपिलार्थीने अपील अर्ज करतांना, जोडावयाच्या कागदपत्रात संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाची प्रत न जोडल्यामुळे या अपील अर्जासंदर्भात त्यांना अपिलाची सुनावणी घेता आली नाही असे दिसून येते व हे त्यांचे म्हणणे आयोग मान्य करत आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व अपिलार्थीची गैरहजेरी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत्यक्षात केलेला युक्तिवाद पाहता, या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी लागणारे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिलेली नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये जरी मनीऑर्डरच्या पावतीचा क्रमांक व दिनांक कळविला असला तरी त्यांनी कथित मनीऑर्डरच्या पावतीची झेराक्स प्रत आयोगास सादर केली नाही याची येथे विशेषत्वाने नोंद घेण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या शपथपत्राव्दारे, त्यांना अशा प्रकारची मनीऑर्डर प्राप्त झाली नसल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिका-याकडून माहिती हवी असल्यास माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ मधील तरतुदीप्रमाणे अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात,

त्यांच्याकडून तशा प्रकारच्या सूचना प्राप्त झाल्यानंतर, भरणा करणे आवश्यक आहे. या प्रकरणामध्ये जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना अपिलार्थी यांच्याकडून सदर माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कोणत्याही प्रकारची मनीऑर्डर प्राप्त झाली नसल्याचे शपथपत्राव्दारे लिहून दिले आहे. तद्वतच अपिलार्थीने सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरल्याबाबत कोणताही ठोस पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही व आज सुनावणीस ते गैरहजर आहेत हे पाहता, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात मनीऑर्डर पाठविली होती किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. तेव्हा आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीने आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात भरले नाही असे अनुमान आयोग काढत आहे. व या अनुमानावरुन अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. केशवराव कोंडबाराव लोखंडे, जि.प. प्रशालेच्या मागे, शास्त्रीनगर, मु. पो. तालुका कळमनुरी, जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा विशेष भूसंपादन अधिकारी, अपर पेनगंगा प्रकल्प, पूसद, जिल्हा यवतमाळ, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४१

निर्णय दिनांक ०६-१२-२००७

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, : अपिलार्थी
उपाध्यक्ष औरंगाबाद शहर मा. अण्णा हजारे
प्रणित भ्रष्टाचार विरोध जन आंदोलन,
एन- ११, के-४० / ४, नवजीवन कॉलनी,
हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा माहिती अधिकारी, वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, घाटी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद

| | | |
|---|---|---|
| जन अपिलीय अधिकारी | : | प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद |
| जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद |
| जन अपिलीय अधिकारी | : | वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद |

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीस खालील प्रमाणे अधिकारी उपस्थित होते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. महमद अब्दुल जाविदखान | जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद |
| २ | श्री. नं. वि. द्रवीड | जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी | | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद |
| ३ | श्री. पंडित विष्णूपंत बारस्कर | जन माहिती अधिकारी | : | प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद |
| ४ | श्री. रहमत महमू खादरी | जन अपिलीय अधिकारी | : | वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद |

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००२ ते २००६ या कालावधीतील वैद्यकीय महाविद्यालयामध्ये केल्या गेलेल्या खर्चाची माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

" शासनाने किती अनुदान मंजूर केले त्याची सत्यप्रत मंजूर केलेल्या अनुदानापैकी झालेला खर्च तपशीलवार सत्यप्रत मिळणेसंबंधी, रुग्णालय अंतर्गत असलेले सप्लायर्स / संस्थाधारक / कॉन्ट्रॅक्टर्स त्यांच्या रजिस्ट्रेशनची सत्यप्रत व त्यांचा कालावधी / त्यांना कोण

कोणत्या बेसवर सप्लाय व कॉन्ट्रॅक्ट दिले त्या कामाची सत्यप्रत / सप्लायरची जाहिरात दिली होती का / रुग्णासाठी जेवणाचा खर्च किती त्याचा तपशील व सत्यप्रत / सायकल स्टॅण्डवर खर्च किती व नफा किती व / कॉन्ट्रॅक्टर कोण त्याचे ॲग्रीमेंट व जाहिरात दिली होती का या सर्व बाबींची सत्यप्रत / औषधीवर / स्टेशनरीवर झालेला खर्च त्यांचा तपशील व सत्यप्रती / औषधी कोणत्या कंपनीचे वापरतात त्या कंपनीचे ॲग्रीमेंटची सत्यप्रत / शासकीय विद्यालयास किंवा निवासस्थानास रिपेअरींग व कलरींग करण्यात येते ते विद्यालयामार्फत करता किंवा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करतात त्याची माहिती / बांधकाम किंवा रिपेअरिंग किंवा कलर करीत असतांना त्याचा घेतलेला ठराव व झालेल्या कामाचा ठरावावर झालेल्या अधिका-यांच्या सह्यांची सत्यप्रत.''

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीपैकी काही माहिती वैद्यकीय महाविद्यालय व काही माहिती वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाशी संबंधीत होती. ही दोन्ही प्राधिकरणे काही प्रमाणात स्वतंत्र असून अपिलार्थीने मागितलेली माहिती देण्याकरिता २ वेगवेगळे जन माहिती अधिकारी दोनही प्राधिकरणाने नेमले आहेत त्याचा उल्लेख वर केलेला आहे.

अपिलार्थीने केलेल्या प्रथम अर्जास वैद्यकीय महाविद्यालयाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीने त्यांना दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागणी केलेली माहिती भरपूर असल्यामुळे ती एक महिन्याच्या आत देणे अशक्य आहे असे कळवून माहिती प्राप्त होताच ती अपिलार्थीस कळविण्यात येईल असे अपिलार्थीस कळविले.

अपिलार्थीच्या या अर्जावर वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयाचे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी संबंधीत काही माहिती अपिलार्थीस दिनांक ०३-०४-२००६ रोजी पुरवून उर्वरीत माहिती विभागाकडून प्राप्त होताच अपिलार्थीस पाठविण्यात येईल असे त्यांनी

अपिलार्थीस आश्वासीत केले. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या माहितीच्या पृष्ठांची संख्या ८ इतकी आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर शासकीय महाविद्यालय व रुग्णालय या दोन्ही संस्थाकडील जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. सध्या कार्यरत असलेले महाविद्यालयाकडील जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने ज्यावेळी अपील अर्ज केला त्यावेळी महाविद्यालयाचे जन अपिलीय अधिकारी म्हणून अधिष्ठाता हे दोन्ही प्राधिकरणाकरिता एकमेव जन अपिलीय अधिकारी होते. तथापि तदनंतरचे अधिष्ठाता यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांनी महाविद्यालय व रुग्णालय या दोन्ही संस्था करिता वेगवेगळे जन अपिलीय अधिकारी नेमले. अपिलार्थीने केलेल्या दिनांक ०४-०४-२००६ रोजीच्या अपील अर्जासंदर्भात संबंधीत जन अपिलीय अधिकारी (तत्कालीन अधिष्ठाता श्रीमती वीणा पाटील) यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेऊन आदेश दिले नसल्याचे दिसून येते. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, मागितलेली माहितीचा तपशील त्यांच्याकडे तयार असून सदर माहितीच्या छायांकीत प्रती नियमानुसार पैसे भरुन घेऊन जाव्यात.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी,

असे म्हटले आहे की, शासकीय माहिती अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्याकडे त्यांनी माहितीसाठी अर्ज केलेला होता. एकूण ५० दिवसानंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अर्धवट माहिती देऊन त्यांची दिशाभूल केली आहे. त्यांनी दिनांक ०४-०४-२००६ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता देखील त्यांना अपिलसंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला नाही, निर्णय घेतला नाही व त्यायोगे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे उल्लंघन केल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलात त्यांचे जे म्हणणे लेखी स्वरुपात मांडले आहे तोच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

वरील घटनाक्रम, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेले युक्तिवाद यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः मागितलेली माहिती २ वेगवेगळ्या संस्थेकडे होती. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय ही दोन्ही शासकीय प्राधिकरणे वेगवेगळी आहेत. त्यांची कार्ये एकमेकांशी काही प्रमाणात सलग्न आहेत. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत उत्तर दिले असले तरी या उत्तराचा सूर नकारार्थी असल्याचे दिसून येते. माहिती खूप असल्याने ती एका महिन्यात देता येणे शक्य नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे अधिनियमातील तरतुदीचा अवमान करणारे आहे असे आयोगाचे मत आहे. याचबरोबर शासकीय रुग्णालयाचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस थोडी माहिती देऊन उर्वरीत माहिती संबंधीतांकडून प्राप्त होताच पुरविण्यात येईल असे कळविले आहे. असे कळविणे देखील माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी विसंगत आहे हे येथे संबंधीतांच्या नजरेस आणून देण्यात येत आहे. याचबरोबर वैद्यकीय

महाविद्यालयाचे जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक १२-०४-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी ३० दिवस जास्त कालावधी लागूनही, त्यांनी नियमानुसार पैसे भरुन माहिती हस्तगत करण्याचे अपिलार्थीस सूचित करण्याची त्यांची ही कृती चुकिची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग करणारी आहे.

एकूणच, या प्रकरणी अपिलार्थीने माहितीसाठीचा केलेला अर्ज, रुग्णालयाच्या व महाविद्यालयाच्या प्रशासनाने आवश्यक त्या गांभीर्याने हाताळला नसल्याचे या ठिकाणी दिसून येत आहे. अपिलार्थीने दिनांक १३-०२-२००६ रोजी माहितीसाठीचा प्रथम अर्ज केल्यानंतर, सदर अर्ज प्रथम ज्या जन माहिती अधिका-याकडे प्राप्त झाला त्यांनी, अपिलार्थीच्या अर्जाची प्रत सदर अर्ज ज्या दुस-या प्राधिकरणाकडे प्राप्त झाला नाही त्या दुस-या जन माहिती अधिका-याकडे ५ दिवसाच्या आत पाठवावयास हवी होती व त्यांची प्रत अपिलार्थीस देणे आवश्यक होते. तथापि त्यांनी या अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही व अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीच्या पत्रास त्यांनी जो प्रतिसाद दिला आहे तोही नकारार्थी व माहिती उपलब्ध झाल्यानंतर आपणास पाठविण्यात येईल अशा प्रकारचा अत्यंत बेशिस्त स्वरुपात दिल्याचे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जावर गांभीर्याने विचार करुन त्यांना आवश्यक ती माहिती देण्यासंदर्भात कोणताही सकारात्मक प्रतिसाद दिला नाही व यावर संबंधीत जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील सुनावणीसाठी न घेऊन कडी केली आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अनुक्रमे विहित मुदतीत माहिती न देऊन व अपिलार्थीचे अपील विहित मुदतीत न ठरवून माहिती अधिकार अधिनियमातील अनुक्रमे कलम ७ (१) व १९ (६) चा भंग केल्याचे निःसंशयपणे सिध्द होत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहिती तयार असल्याचे कळविले. अपिलार्थीने माहिती व्यक्तिशः मागितल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना या स्वरुपाचे पत्र पाठविले. तदनंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती पाहिली. त्यावेळी सदर माहिती पाहिल्यानंतर अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना या माहितीची अनुक्रमाणिका तयार करण्याचे दिनांक ०३-०५-२००६ रोजी सुचविले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित असलेली अनुक्रमाणिका तयार करुन अपिलार्थीस ही माहिती दिनांक ०७-०६-२००६ रोजी दिली. अपिलार्थीस सदर माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या पत्राच्या स्थळप्रतीवर दिनांक ०७-०६-२००६ रोजी सही केल्याचे दिसून येते. यावरुन अपिलार्थीस संपूर्ण माहिती मिळाल्याचे अनुमान काढता येते.

जन माहिती अधिकारी यांनी आपल्या युक्तिवादामध्ये पुढे असे स्पष्ट केले की, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयाकडे एका इसमासह हजर राहून, त्यांनी जन माहिती अधिका--यास “ ते त्यांचे सेवक आहेत, माहितीचा अधिकार कायद्याखाली तुम्हाला आम्ही अंदर करु शकतो ” अशी धमकी देऊन, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे पैशाची मागणी केली. अपिलार्थी हे त्यांच्याकडे वारंवार माहिती मागत असतात. या प्रकरणी त्यांनी माहिती तयार ठेऊन व ती अपिलार्थीने पाहिल्यानंतर, ती माहिती व्यक्तिशः हस्तगत करण्यासाठी अपिलार्थी १ महिना इतका उशिराने त्यांच्याकडे उपस्थित झाले.

उपरोक्त प्रकरणी वर नमूद केल्याप्रमाणे जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे विहित मुदतीत कारवाई न करुन आपल्या

कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे याची सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब लावला आहे. तथापि ही माहिती जन माहिती अधिकारी यांना त्यांच्याकडील वेगवेगळे सहाय्यक / कर्मचारी यांच्याकडून प्राप्त करुन नंतर ती अपिलार्थीस द्यावयाची होती. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती देण्यासाठी त्यांचे सहाय्यक / कर्मचारी जे जबाबदार असतात त्यांना देखील जन माहिती अधिकारी समजावे अशी तरतूद आहे. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याबरोबरच त्यांचे इतर सहाय्यक व कर्मचारी हेही तितकेच जबाबदार आहेत.

अधिष्ठता, शासकीय महाविद्यालय, वैद्यकीय अधीक्षक शासकीय रुग्णालय यांनी या सर्वांवर, त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लावलेल्या विलंबाबाबत, सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत पाठवावा. मूळ अर्जामध्ये व व्दितीय अपिलामध्ये अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठे असल्याचे दिसून येते. अपिलार्थीचे वर्तन व अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, त्यांनी येथून पुढे भविष्यात त्यांच्याकडे दाखल होणा-या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार सकारात्मक कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही भाष्य नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, येथून पुढे भविष्यात त्यांच्याकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ संदर्भात दाखल होणा-या अर्जावर माहितीचा अधिकार अधिनियमामधील तरतुदीनुसार सकारात्मक कारवाई करावी.

३. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपिलावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील विहित तरतुदीप्रमाणे, विहित मुदतीत कारवाई न करुन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे याची सचिव, (वैद्यकीय शिक्षण) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी.

४. अधिष्ठाता, शासकीय महाविद्यालय, वैद्यकीय अधीक्षक शासकीय रुग्णालय यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी जबाबदार असणा-या सर्व सहाय्यक / कर्मचारी यांच्यावर, प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करुन त्याचा अनुपालन अहवाल आयोगास, हे आदेश निर्गमीत होताच एक महिन्याच्या आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कल्याण सोपानराव सोनवणे, उपाध्यक्ष औरंगाबाद शहर मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोध जन आंदोलन, एन- ११, के-४० / ४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, न्यायवैद्यकशास्त्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव (वैद्यकीय शिक्षण), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ सचिव, (सार्वजनिक आरोग्य), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर

प्रसिध्द करण्यासाठी.

९ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४२

निर्णय दिनांक ०६-१२-२००७

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, : अपिलार्थी
सेवा निवृत्त अधिकारी,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड,
व्दारा – घर नं. ३-२-२५२, गंगाधाम,
गवळीपुरा,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त,
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

प्रत्यक्षातः जन माहिती अधिकारी : सहाय्यक आयुक्त (आस्थापना), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,
नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्थापना), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका श्री. विलास पुंडलीकराव भोसीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका श्री. अजय रा. चारठाणकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-०४-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. रत्नाकर कांतराव कुक्कडगावकर (वाघमारे) यांना उप आयुक्त पदी दिलेल्या बढतीसंदर्भात एप्रिल २००६ या कालावधीतील आस्थापना विषयक माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

"१. श्री. रत्नाकर कांतराव कुक्कडगावकर (वाघमारे) उपायुक्त पदाचे बढतीचे आदेश,

 २. निवड समितीचा ठराव,

 ३. नांदेड वाघाळा महानगरपालिकाचे ठराव,

 ४. सदर बढतीबाबत प्रशासनाचे टिपणी.

२. मालमत्ता करवाढीला स्थगिती देण्यात बाबतचा ठराव, त्या ठरावाची प्रत,

३. महानगरपालिकेचे गाळे धारक भाडेकरुची भाडेवाढ रद्द करण्याचा ठराव."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस श्री. रत्नाकर वाघमारे यांच्या पदोन्नतीसंदर्भात माहिती दिलेली आहे व याचबरोबर श्री. रत्नाकर वाघमारे यांना उप आयुक्त या अभिनामाच्या पदावर पदोन्नती देण्याबाबत निवड समिती अथवा महानगरपालिका सर्वसाधारण सभेचा ठराव झालेला नाही किंवा पदोन्नतीबाबतची कोणतीही प्रशासकीय टिपणी महासभेसमोर देण्यात आलेली नाही व त्यांना उप आयुक्त पदाचे बढतीचे आदेशही निर्गमीत केले नसल्याबाबत कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या या पत्रामध्ये अपिलार्थीच्या मूळ माहिती संदर्भातील अर्जामधील मुद्दा क्रमांक २, ३ शी संबंधीत माहितीचा समावेश नसल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अद्यापपावेतो सुनावणी झाली नाही असे अपिलार्थीने आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर असे प्रतिपादीत केले की, त्यांच्याकडील दिनांक १२-१०-२००६ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या कार्यालयात दिनांक १८-१०-२००६ रोजी सुनावणीसाठी बोलाविले होते. परंतु सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नसल्याने त्या दिवशी सुनावणी होऊ शकली नाही. तथापि सदर सुनावणीचे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीची सही असलेले त्यांचे दिनांक १७-१०-२००६

रोजीचे पत्र आयोगास दाखविले. त्यामध्ये अपिलार्थीने दिनांक १८-१०-२००६ रोजीच्या सुनावणीस त्यांना उपस्थित राहणे शक्य नसल्याचे जन अपिलीय अधिकारी यांना कळविले आहे. तथापि सदर पत्र दुस-या अर्जासंदर्भात केलेल्या अपिल प्रकरणी पाठविले असल्याचे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०९-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील अर्जावर कोणतीही सुनावणी घेतली नसल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी हे माहिती देण्यासाठी टाळाटाळ करत असल्याचे म्हटले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या विषयावर कायम माहितीची मागणी करत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीच्या व्दितीय अपिल प्रकरणी सुनावणी घेण्यापुर्वी, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रत्येक अर्जनिहाय व त्यासंदर्भातील प्रथम अपिलनिहाय वेगवेगळ्या सुनावण्या घेऊन, आपले वेगवेगळे आदेश पारीत करणे गरजेचे राहील असे आयोगास वाटते व त्याचबरोबर त्यांना असेही सूचित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस सुनावणीची नोटीस सुनावणीच्या दिवसाच्या किमान १५ दिवस अगोदर पाठवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्ज व अपिलनिहाय वेगवेगळ्या सुनावण्या, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून ३० दिवसाच्या आत घ्याव्यात व प्रत्येक प्रकरणी, आपले स्वतंत्र निर्णय अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीमध्ये स्वतंत्ररित्या पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगाराम गौड, सेवा निवृत्त अधिकारी, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड, व्दारा – घर नं. ३-२-२५२, गंगाधाम, गवळीपुरा, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (आस्थापना), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (प्रशासन), नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४४

निर्णय दिनांक ०६-१२-२००७

१ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, : अपिलार्थी
सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,
तालुका शाखा मुखेड,
व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन,
मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा. मेथी,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती
कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

### निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा.

मेथी श्री. संभाजी किशन कांबळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती श्री. पंडितराव गोविंदराव पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २००६ या वर्षाच्या कालावधीतील चालू असलेल्या बांधकामासंदर्भात काही माहिती खालील प्रमाणे मागितली होती.

“१. सध्या चालू असलेल्या बांधकामाचे अंदाजपत्रक आणि वर्क ऑर्डरची संक्षिप्त झेरॉक्स प्रत देणे.

२. आलेला एकूण निधी किती व केव्हा आला व कामासाठी केव्हा वापरात आणला. बांधकामाच्या अगोदर निधी उचलला गेला का ? तसे झालेले असेल तर रक्कम उचलून कोणते काम करण्यात आले त्याचा खुलासा देण्यात यावा. ऑकाऊंटची झेरॉक्स प्रत असलेली दिनांक उशिरा सुरु करण्याची कारण काय.”

अपिलार्थीने सदर माहिती टपालाने मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणतीही माहिती मिळाली नसल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये त्यांना आजही स्वारस्य आहे. सदर माहिती त्यांना लवकरात लवकर मिळावी व त्याचबरोबर ज्या जन माहिती अधिका-याने त्यांना अद्यापपर्यत माहिती दिली नाही त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे यथायोग्य कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १९-०५-२००७ रोजी रुजू झाले असून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची त्यांना कोणतीही कल्पना नव्हती. अपिलार्थीने काही माहिती मागितली आहे याची कल्पना त्यांना आयोगाचे सुनावणीसाठीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर झाली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १८-०९-२००६ रोजी रुजू झाले असून त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचा शोध घेऊनही ते त्यांना प्राप्त होऊ शकले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकता नांदेड जिल्हा परिषदेचा कारभार

कसा व कोणत्या दिशेने चालला आहे याचे पुरेपूर दर्शन होते. संबंधीत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचे कार्यालयात अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलाची प्रत मिळू शकली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे नवीन रुजू झाले आहेत असा त्यांचा दावा आहे. तथापि त्यांनी कार्यभार स्विकारतांना संबंधितांकडून आवश्यक ती कागदपत्रे स्विकृत करुन पदभार घ्यावयास हवा होता व जर त्यांच्या पुर्वीच्या कर्मचा-याने त्यांना आवश्यक ते अभिलेखे हस्तांतरित केली नसतील तर ही बाब त्यांच्या वरिष्ठांच्या नजरेस आणावयास हवी होती. तथापि, या दोन्ही अधिका-यांनी आयोगाकडे केलेल्या युक्तिवादावरुन त्यांनी अशी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही तसेच या दोन्ही अधिका-यांच्या कार्यालयामध्ये अभिलेखे व रेकॉर्ड विस्कळीत झाले असल्यासारखे वाटते. अर्थात हे सर्व विस्कळीत होण्यास तत्कालीन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे जबाबदार आहेत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरण त्यांच्या काळात झाले नसून ते दिनांक १८-०९-२००६ रोजी रुजू झाले असल्याने व त्यांनी शोध घेऊनही अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही हा केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या अकार्यक्षमतेचा कळस गाठल्याचे आयोगास दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अकार्यक्षम कार्यपध्दतीमुळे अपिलार्थी हे एक वर्ष ७ महिने इतक्या कालावधीपासून त्यांना हवी असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यास वंचित राहिले आहेत. त्यांना इतक्या प्रदीर्घ कालावधीपासून माहितीसाठी वंचित ठेवण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस इतक्या प्रदीर्घ कालावधीने देखील माहिती उपलब्ध करुन न दिल्याने व त्यायोगे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे सिध्द होत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती मिळण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या, अपिलार्थीचे अपील वेळेवर न ठरविण्याच्या कृतीची व बेजबाबदार वृत्तीची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी वरील वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्यामुळे त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर एका महिन्यात सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर एका महिन्यात आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, तालुका शाखा मुखेड, व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन, मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा. मेथी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४५

निर्णय दिनांक १०-१२-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी,<br>नोमनियानगर, तरोडा (बु.),<br>नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा अधीक्षक अभियंता,<br>नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. राम संभाजीराव बिरादार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. सय्यद सिकंदर हाशमी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०४-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २५-०१-२००६ ते ०४-०२-२००६ या कालावधीतील माहिती खालील प्रमाणे एकूण ७ मुद्दयावर मागितली होती.

“ १. श्री. मो. मो. फारुकी सचिव यांत्रिकी मंडळ सेवकांची सहकारी पत संस्था म. नांदेड हे आपल्या कार्यालयीन कक्षात कोणत्या तारखेस, किती वाजता, ते एकटे आले होते की, त्यांच्या सोबत कोण आले होते, त्यांची नावे व पद ई. बाबत माहिती देण्यात यावी.

२. श्री. मो. मो. फारुकी सचिव हे कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग नांदेड यांचे कक्षात परवानगीने आले होते की, विनापरवानगीने व कोणत्या कामासाठी याची माहिती द्यावी.

३. श्री. फारुकी सचिव हे विष्णूपूरी पंपगृह विभाग नांदेड या विभागात कारकून या पदी असल्याचे ही बाब कार्यकारी अभियंता नांदेड पाटबंधारे विभाग यांना केव्हा व कोठून समजली याची माहिती द्यावी.

४. श्री. फारुकी सचिव यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम वर्तणूक नियम १९७९ लागू आहे, कार्यकारी अभियंता नांदेड पाटबंधारे विभाग नांदेड यांना लागू नाहीत का याची माहिती द्यावी.

५. श्री. फारुकी सचिव यांनी कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग नांदेड यांचे कक्षात कार्यालयीन वेळेत येऊन कार्यकारी अभियंता यांचेशी उध्दटस्वरुपाची भाषा वापरुन काय बोलले व कोणती गैरवर्तन केले याची सविस्तर माहिती द्यावी. श्री. फारुकी यांनी बोलत असतांनाच कार्यकारी अभियंता यांनी फौजदारी कार्यवाही का केली नाही. कार्यकारी अभियंता यांचेवर कोणाचे दबाव होते का ? श्री. फारुकी दारु पिवून आले होते का ? सदर घटना घडल्यानंतर त्यांच्या वरिष्ठ अधिका-यांना कळविण्याचा काय उद्देश होता हे सर्व शासनाच्या कोणत्या नियमानुसार आहे याची माहिती द्यावी.

६. माहिती अधिकार अर्ज कोणी सादर केला होता, सदर माहिती अधिकार अर्जात कार्यकारी अभियंता यांना माहिती कमी स्पष्टीकरण / खुलासे जास्त होते असे का वाटते. या अर्जा माहिती कोणती व स्पष्टीकरण आणि खुलासे कोणते तसेच या अर्जात उध्दट व उपमर्दकारक वाक्ये व उध्दट उपमर्दकारक वर्तणूक कोणकोणती याची सविस्तर माहिती द्यावी.

७. कार्यकारी अभियंता नांदेड पाटबंधारे विभाग नांदेड हे कार्यालय शासनाचे आहे की कार्यकारी अभियंता या पदावर कार्य कारणारे व्यक्तीचे याची माहिती द्यावी. शासनाच्या कोणत्या नियमानुसार कोणाला शासकीय कार्यालयात येण्यास प्रतिबंध करता येते याची माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले व अपिलार्थीचा अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (जी) नुसार फेटाळला.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, मिळालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही व ही बाब जन अपिलीय अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळेस देखील मान्य केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीचे अपील ठरविण्याची ही पध्दत चुकिची असून त्यांनी अपील ठरवितांना, जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून या संदर्भातील आपला निर्णय पारीत करणे हे "अपील ठरविणे" या प्रक्रियेत अभिप्रेत आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अशा प्रकारची या प्रकरणी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही. येथून पुढे त्यांनी, अशा प्रकारे अपिलाची सुनावणी करु नये अशा प्रकारच्या सूचना त्यांना देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता, अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या पत्राने निर्णय कळविला आहे. या निर्णयामध्ये, अपिलार्थीने मागितलेली माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ (च) नुसार माहितीच्या व्यवस्थेत बसत नसल्याने अपिलार्थीचे अपील फेटाळले आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती

आयोगाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीच्या अपील अर्जाचे अवलोकन करता, यामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते. त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस शासनाने दिलेल्या अधिकाराचा वापर न करण्याबाबत धमकावले असल्याने, त्यांच्यावर शासनाच्या नियमानुसार कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना त्यांच्या मूळ अर्जास उद्देशून जे पत्र लिहिले आहे ते कार्यकारी अभियंता नांदेड पाटबंधारे विभाग या नात्याने लिहिले असून ते जन माहिती अधिकारी या नात्याने लिहिलेले नाही. त्याचबरोबर कार्यकारी अभियंता यांनी या पत्रामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, “ आपण अनावश्यक पत्रव्यवहार करुन या कार्यालयातील कर्मचा-यांवर मानसीक दबाव आणण्याचा प्रयत्न करु नये. या शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होणे म्हणजेच पर्यायाने शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणे होय याची कृपया नोंद घ्यावी. ” तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिनांक २१-०२-२००६ रोजीच्या पत्राची प्रत अधीक्षक अभियंता यांत्रिकी मंडळ व कार्यकारी अभियंता विष्णूपूरी पंपगृह विभाग यांना कोणत्या संदर्भाने दिली हे समजून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर नुकतेच दिनांक ०६-११-२००७ रोजी रुजू झाले आहेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची विनंती त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-०२-२००६ रोजी पत्रान्वये फेटाळली आहे. अपिलार्थीचा सदर अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (जी) मधील तरतुदीनुसार फेटाळण्यात आला आहे. त्याचबरोबर अपिलार्थीचा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांनी यांच्याकडील दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या

पत्रान्वये, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ३ (च) नुसार फेटाळला आहे. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला आहे की, अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना आता माहिती मिळाली असून त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी जे धमकावणीचे पत्र दिले आहे ते परत घ्यावे. अपिलार्थी यांनी देखील त्यांच्या या म्हणण्यास दुजोरा दर्शविला आहे.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी या दोन्ही अधिका-यांनी चुकिच्या कलमांचा आधार घेऊन अपिलार्थीचा मूळ अर्ज व अपील फेटाळले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती नाकारतांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (त्र) या कलमाचा आधार घेऊन अपिलार्थीचे अपील फेटाळणे जास्त उचित झाले असते, तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचा अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) प्रमाणे फेटाळणे उचित ठरले असते. या दोन्ही अधिका-यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जाव्दारे केलेली विनंती व यावर केलेले अपील चुकिच्या कलमांचा आधार घेऊन फेटाळले असल्याचे दिसते.

या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, कोणत्याही प्रकारे अधिनियमाव्दारे निश्चित केलेल्या कलम २ (च) प्रमाणे निश्चित केलेल्या माहिती या शब्दाच्या व्याख्येत बसत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा माहितीसाठीचा अर्ज फेटाळतांना, फक्त सदर अर्ज फेटाळण्याची कारणे व त्यांच्या निर्णयाविरुध्द कोणाकडे अपील करावयाचे एवढा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांनी अपिलार्थीने म्हटल्याप्रमाणे त्यांच्या या निर्णयामध्ये अपिलार्थीच्या कार्यपध्दतीबद्दल जे भाष्य केले आहे ते जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक नव्हते. तद्वतच, या निर्णयाच्या उत्तराची प्रत इतर कार्यकारी अभियंता यांना देणे

आवश्यक नव्हते.  कारण जरी अपिलार्थी हे दुस-या शासकीय कार्यालयात शासकीय पदावर कार्यरत असले तरी ते भारताचे स्वतंत्र नागरिक आहेत व एक नागरिक म्हणून त्यांनी माहितीसाठीचा अर्ज केला होता.  त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस लिहिलेल्या पत्राच्या प्रती अपिलार्थीच्या कार्यालयास देणे व्यर्थ आहे.  याचबरोबर कोणत्याही अपिलार्थीस माहिती देतांना ती जन माहिती अधिकारी या नात्याने देणे आवश्यक आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.  या पत्रामध्ये त्यांनी आपली सही करतांना जन माहिती अधिकारी असा उल्लेख करणे गरजेचे होते.  कार्यकारी अभियंता इत्यादी तपशील त्यांनी दिला नसता तरी चालू शकले असते.  तथापि जन माहिती अधिकारी असा उल्लेख करणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार अनिवार्य आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.  थोडक्यात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अर्जास उत्तर देतांना काही तांत्रिक चूका केल्या आहेत.  इतःपर, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील अर्जाच्या संदर्भात त्यांच्या हातून होणार नाहीत, याची त्यांनी यापुढे दक्षता घ्यावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांच्या निकालात अनावश्यक संदर्भ इतःपर टाळावा असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

औरंगाबाद                                        ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नोमनियानगर, तरोडा (बु.), नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४६

निर्णय दिनांक १०-१२-२००७

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, पत्रकार, : अपिलार्थी

गोविंदराज प्रिंटींग प्रेस, बसवेश्वर चौक,

साईबाबा मंदिर जवळ, रेल्वे स्टेशन रोड, उदगीर,

तालुका उदगीर,

जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा माहिती अधिकारी, विभागीय शिक्षण

उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा विभागीय शिक्षण उपसंचालक,

लातूर विभाग, लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर

जन अपिलीय अधिकारी : विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनंत गोविंदराव पारसेवार (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक श्री. अरुण येडबा व्हटकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक श्री. खतीब सय्यद जियाउल्ला (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १०-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे १९९७ – ९८ ते १०-०७-२००६ या कालावधी-तील समर्थ उच्च माध्यमिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यातील विज्ञान शाखेतील शिक्षकांना दिलेल्या मान्यतेसंदर्भात एकूण ३ मुद्दयावर माहिती मागितली असून, त्यामध्ये आरक्षित जागेवर श्री. डी. डी. गौंडगावे व श्री. बी. डी. चिंचोलकर या बिगर मागासवर्गीयांना दिलेल्या

नियुक्ती संदर्भात व कायम स्वरुपी मान्यता देण्यासंदर्भातील माहितीचा समावेश आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळ्या मुद्यावर खुलासा मागितल्याचा व आपली माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर्ड टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०४-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राबरोबर त्यांनी संबंधीत संस्थेतील शिक्षक नेमणुकीस मान्यता दिलेल्या पत्राच्या त्यांच्याकडील दिनांक २२ ऑक्टोंबर २००२ व ३० मे २००२ च्या प्रती पुरविल्या.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती दिली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व अपिलार्थीने उपस्थित केलेल्या विषयाचे गांभीर्य पाहता या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाची सुनावणी घेणे अनिवार्य आहे असे आयोगाचे मत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या प्रथम अपिलाची सुनावणी हे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत घ्यावी व आपले अंतीम आदेश त्याच दिवशी पारीत करावे. अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निकालाने जर समाधान झाले नाही तर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०८-२००६ रोजीच्या प्रथम अपिलावर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून १५ दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय त्याच दिवशी पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनंत गोविंदराव पारसेवार, पत्रकार, गोविंदराज प्रिंटींग प्रेस, बसवेश्वर चौक, साईबाबा मंदिर जवळ, रेल्वे स्टेशन रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४७

निर्णय दिनांक १०-१२-२००७

१ श्री. कदम गोविंदराव घडलिंग, : अपिलार्थी
मु. पो. करखेली, तालुका धर्माबाद,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला
करखेडी, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. कदम गोविंदराव घडलिंग हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला करखेडी, श्री. निरडी हनमान्लू गंगाराम (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचे प्रतिनिधी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद श्री. पाटील मनोहर धोंडिबाराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक श्री. बालासाहेब लक्ष्मणराव गाढे हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०७-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ सर्व शिक्षण अभियान व इतर माध्यमातून हायस्कुलसाठी मिळालेला निधीचा तपशील व शिक्षण समिती आहे का ? कोणी नाही ? खर्च कसा करता.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन त्यांच्याकडील दिनांक २२-०८-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि ही माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रीत्यर्थ

पोहोच कोठेही उपलब्ध नाही.  जन माहिती अधिकारी यांना या संदर्भात विचारले असता त्यांनी ही माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः दिली आहे असे शपथपत्रपत्राव्दारे आयोगासमोर कबूल केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०८-२००६ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीचे सदर अपील हे त्यांनी मूळ अर्ज केलेल्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आतमध्ये केले असल्याने ते अपरिपक्व ठरत आहे.  तद्वतच या अपील अर्जावर अपिलार्थीने १० रुपये इतक्याच किंमतीचे कोर्ट स्टॅम्प चिकटविले आहे.  सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही, असे जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सुनावणीमध्ये कबूल केले आहे व अपिलार्थीचे सदर अपील त्यांच्याकडे प्राप्त झाले नसल्याचे त्यांचे म्हणणे त्यांनी शपथपत्राव्दारे निवेदीत केले आहे.  जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज प्राप्त न झाल्याने त्यावर काहीही कारवाई केलेली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून या अपील अर्जावर कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-११-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.  या अपिलामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, त्यांनी प्रथम अपील केल्यावर त्यावर काहीही उत्तर मिळाले नाही असे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या दिनांक २२-०७-२००६ रोजीच्या अर्जास उद्देशून अपिलार्थीने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये

म्हणजेच दिनांक २२-०८-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीकडे त्यांना माहिती प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ पोहोच मागितली असता अपिलार्थीने ती दिली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचा अपील अर्ज प्राप्त झाला नाही व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस जी माहिती पुरविली आहे ती अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहितीशी सुसंगत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी प्रथमतः अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्येच त्यांना मिळाली आहे. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेले अपील हे अपरिपक्व व केवळ १० रुपयाच्या कोर्ट स्टम्पवर केले आहे. त्यामुळे अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी अवलंबिलेली प्रक्रिया मूळात येथे खंडीत होते. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती ही, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे आयोगास आढळून आले आहे. हे सर्व पाहता अपिलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १०-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कदम गोविंदराव घडलिंग, मु. पो. करखेली, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्रशाला करखेडी, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३८

निर्णय दिनांक ११-१२-२००७

१ श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, : अपिलार्थी
मेन रोड, निंबाळकर गल्ली,
उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा तहसीलदार, उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद श्री. रत्नदीप गायकवाड (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री. विकास वामनराव नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने, सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १३-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, सन २००३ या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती माहिती मागितली होती.

" उस्मानाबाद नगरपरिषद हद्दीतील मंजूररेखांकनाचे अकृषि परवाना देण्याचे कोणत्या अधिका-याला अधिकार आहेत. उस्मानाबाद नगरपरिषद हद्दीमधील सर्व्हे नं. १२४/३/२ मधील अकृषि परवान्यासाठी घेतलेली मंजूर रेखांकनाची छायांकीत सत्यप्रत. यासंबंधाने कार्यालयाने घेतलेल्या मोजणी नकाशाची छायांकीत सत्यप्रत. ७/१२ ची छायांकीत सत्यप्रत. अकृषि परवान्याची छायांकीत सत्यप्रत. (No. 2003/JMB/NAAH/WS-1124) office of the Tahsildar O,bad Date 20-12-200

नगरपरिषद हद्दीमधील तहसील कार्यालयाने मंजूर केलेली श्री. महादेव काकडे मुख्यत्यार श्री. मुंढे यांच्या सर्व्हे नंबर १२४/३/२ मधील रेखांकनाची अकृषिक परवाना

मिळविण्यासाठी आपल्या कार्यालयात दाखल केलेले शासननियमाने आवश्यक असलेल्या कागदपत्रांची सत्यप्रत (उदा. मोजणी नकाशा, ७/१२, मंजुर रेखांकनाची प्रत व इतर कागदपत्रे) तसेच यासंबंधाने आपल्या कार्यालयाने दिलेल्या अकृषिक परवान्याची सत्यप्रत.”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०१-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व त्यांनी मागितलेल्या इतर सहपत्राच्या प्रती अपिलार्थीस या पत्राव्दारे दिलेल्या आहेत. सदर माहिती अपिलार्थीस मिळाल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०१-०३-२००६ च्या पत्राच्या स्थळप्रतीवर त्यांच्या प्रतिनिधीने (भाऊ) सही केली आहे. अपिलार्थीस द्यावयाची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिली. तथापि त्यावेळी अपिलार्थीच्या भावाने अपिलार्थीकडून अधिकारपत्र घेऊन ते जन माहिती अधिका-यास सादर केले होते किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. कारण अशा प्रकारचे कोणतेही अधिकारपत्र जन माहिती अधिकारी यांच्या नस्तीवर उपलब्ध असल्याचे आढळून आले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, दिनांक २१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये अपिलार्थी यांनी, त्यांना दिलेल्या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलीय प्राधिकरणाचा तपशील व कालावधी त्यांना कळविला नसल्याचे नमूद केले असून, जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ७ (८) चा भंग केला असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून, जन माहिती अधिकारी यांनी जाणून-बुजून व चुकिची व अपुरी माहिती

दिल्याचे म्हटले आहे व त्याचबरोबर जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे दंडीत करण्याची विनंती केली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली किंवा कसे हे कळण्यास मार्ग नाही. आयोगासमोर उपस्थित असलेले जन अपिलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपिलार्थीने अपील अर्ज करण्याच्या वेळी ते स्वतः जन अपिलीय अधिकारी या पदावर कार्यरत नव्हते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जाची कोणतीही सुनावणी घेतली नाही व अपिलार्थीच्या अर्जावर त्यांनी तहसीलदार उस्मानाबाद यांच्याकडून अहवाल मागितला व त्या अहवालाच्या आधारे त्यांनी आपला निर्णय अपिलार्थीस दिनांक ०२-०५-२००६ रोजी कळविला.

जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे अपील, कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता व अपिलार्थीस आपले म्हणणे मांडण्यास संधी न देता फेटाळले.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी नुसार, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांना जाणून-बुजून चुकिची व अपुरी माहिती दिली व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता दिनांक ०२-०५-२००६ रोजी त्यांचे प्रथम अपील फेटाळल्याचे आयोगास कळवून, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जाणून-बुजून चुकिची व अपुरी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी अशी आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे वरील परिच्छेदात नमूद केलेली अपिलार्थीची विनंती हाच त्यांचा युक्तिवाद मानून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली मंजूर रेखांकनाची प्रत व मोजणी नकाशाची प्रत, मूळ अर्जदार अकृषिक परवाना मागणारे श्री. महादेव नारायण काकडे मुख्यत्यार श्री. अनिल मुंढे यांनी केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या नव्हत्या त्यामुळे त्या छायांकीत प्रती त्यांना, अपिलार्थीस पुरविता आल्या नाहीत. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये कोणत्याही भुखंडाचा अकृषिक वापर करण्यासाठी परवानगी देतांना मोजणी नकाशा व मंजूर रेखांकनाची प्रत आवश्यक असते. तथापि प्रश्नाधीन जमिनीवर संबंधितांनी अनाधिकृत बांधकाम करुन या भुखंडाचा अकृषिक प्रयोजनाकरिता अनाधिकृत वापर केला आहे. सदर अनाधिकृत वापर अधिकृत करण्याच्या दृष्टीने संबंधीत भुखंडाच्या वापराचे अकृषिक प्रयोजनार्थ रुपांतर करावयाचे झाल्यास त्याकरिता मंजूर रेखांकन व मोजणी नकाशाची सक्ती संबंधीतावर सर्वसाधारणतः केली जात नाही. अनाधिकृत बांधकाम अधिकृत करण्यामागे संबंधीत बांधकाम अधिकृत करुन आवश्यक तो कर प्रथमतः प्राधान्याने वसूल करुन शासनचा महसूल वाढविणे, अशा प्रकारच्या कृतीमागे, प्रमुख उद्देश असतो. सदर अनाधिकृत बांधकाम नियमीत करतांना अनाधिकृत बांधकाम करणा-या व्यक्तीवर महसूल संहितेप्रमाणे, आवश्यक त्या दंडाची आकारणी करुन मग ते बांधकाम नियमित करण्यात येते. तेव्हा उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहिती संबंधातील भूखंडावरील अनाधिकृत बांधकाम अधिकृत करण्याच्या दृष्टीने, सदर अर्ज महसूल प्राधिकरणाने संबंधीत जमीन मालकाकडून करुन घेतला होता. संबंधीत मालकाने या अर्जासोबत मोजणी नकाशाची प्रत सोबत जोडली नसल्याने ती अपिलार्थीस देता आली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे, जन माहिती अधिकारी यांनी वरीलप्रमाणे केलेल्या युक्तिवादास दुजोरा देण्यात आला.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व जन अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुळात, मुख्यत्यार श्री. अनिल मुंढे यांनी मूळ रेखांकनाची व मोजणी नकाशाची प्रत दाखल केली नसल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही. तथापि श्री. अनिल मुंढे यांनी अकृषिक परवान्यासाठी केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्राच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस दिल्या आहेत व त्याचबरोबर अकृषिक परवाना आदेशाची नक्कलही त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली आहे, हे पाहता अपिलार्थीने मागितलेली सर्व माहिती त्यांना मिळाली आहे असे अनुमान काढण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सादर केलेला पत्रव्यवहार पाहता, जन अपिलीय अधिकारी यांच्या अपील ठरविण्याच्या पध्दती शिवाय इतर कोणतीही आक्षेपार्ह बाब आयोगास त्यात आढळून आली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील ठरवितांना रितसर नोटीस काढून या अपिलावर आपला निर्णय देणे सर्वसामान्य परिस्थितीत अपेक्षित होते. तथापि जन अपिलीय अधिकारी यांची अपिलार्थीस सुनावणीसाठी न बोलावण्याची कृती, त्यांच्यातील बेजबाबदारपणाची व त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव दर्शविणारी अशी ठरते. त्यांच्या या कार्यशैलीची नोंद जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी यथायोग्यरित्या घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहिती त्रयस्त पक्षासंबंधीत असल्याने या त्रयस्त पक्षासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थिती विचारात घेणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तेव्हा येथून पुढे कोणत्याही अर्जदाराने त्रयस्त पक्षाविषयी माहिती विचारल्यास त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ११ चे कसोशीने पालन करावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

प्रसंगावशात, जरी बांधकाम अनाधिकृत असले तरीही ते अधिकृत करण्याकरिता, मंजूर मोजणी नकाशा व मंजूर रेखांकन कोणाही अर्जदारास अर्जासोबत असण्याची अट अनिवार्य करण्याबाबत सचिव, (महसूल) यांनी विचार करावा असे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (a) (IV) अन्वये सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील सर्व उपलब्ध माहिती विहित मुदतीत दिली असल्याने अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपिल फेटाळण्यायोग्य आहे या निष्कर्षाप्रत आयोग आला असल्याने खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निंबाळकर उदयसिंह प्रकाशराव, मेन रोड, निंबाळकर गल्ली, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या

निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, (महसूल), मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३९

निर्णय दिनांक ११-१२-२००७

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी

२७ / ५२५, माणिक चौक, माणिकनगर,

उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा

अधीक्षक, कृषि अधिकारी कार्यालय,

उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कृषि उपसंचालक, उस्मानाबाद

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रशासन अधिकारी श्री. नानासाहेब श्रीपतराव पाटील (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उप संचालक श्री. विठ्ठल भगवानराव मोरे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे ०१-०१-१९९० ते २८-०२-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ माहितीचा अधिकार २००५ च्या अधिनियमातील कलम ४ (१) (ब) नुसार कार्यवाही करुन विविध प्रकारच्या १७ बाबींवरील प्रसिध्द केलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

विविध यंत्रणाच्या माध्यमातून रोहयोव्दारे राबविण्यात येणा-या फळबाग लागवड योजनेच्या प्रारंभापासून (१९९०-९१) वर्षनिहाय उस्मानाबाद जिल्ह्यातील लाभार्थ्यांची यादी (लाभार्थी संस्थेचाही समावेश असल्यास त्यासह) गावाच्या नावासह, लाभार्थ्यांनी घेतलेली फळपीक योजना त्यासाठी प्रतिवर्षी देण्यात आलेले अनुदान, फळबाग लावगडीचे क्षेत्र (हेक्टरमध्ये) आदी माहिती देण्यात यावी. तसेच लाभार्थी कोणत्या गटात मोडतो (उदा. अल्प व अत्यल्प भूधारक किंवा अनुसूचित जाती-जमाती) आणि लाभार्थीला देण्यात आलेल्या अनुदानाची टक्केवारी आदी माहितीचाही त्यात समावेश असावा. तसेच दुस-या व तिस-या वर्षीच्या अनुदानास अपात्र ठरलेल्या लाभार्थ्यांचीही माहिती देण्यात यावी. लागवडीवर झालेला अनुदानाचा खर्च वसूल करण्याच्या प्रकरणांची सविस्तर माहिती लाभार्थ्यांच्या नावासह देण्यात यावी.

आपल्या कार्यालयाकडे असलेल्या नोंदणीकृत मजुरांची गावनिहाय यादी व त्यांना काम उपलब्ध झाले नसल्यास वाटप केलेल्या बेकार भत्याची रक्कम आदीची माहिती लाभार्थीनिहाय व वर्षनिहाय देण्यात यावी.

नालाबांध, दगडीबांध, शेततळी, वनराई बंधारे, माती बंधारे, पाझर तलाव, साठवण तलाव आदी योजना कोणत्या कोणत्या गावामध्ये राबविण्यात आल्या त्याची सर्कलनिहाय माहिती देण्यात यावी. तसेच त्यासाठी खर्च करण्यात आलेला निधीही प्रत्येक कामाच्या पुढे दर्शविण्यात यावा. शेततळ्याच्या संदर्भात प्रत्येक लाभार्थीनिहाय नावाच्या व गावाच्या उल्लेखासह माहिती द्यावी.

जिल्हा कृषि अधीक्षक कार्यालयाने विभागीय कार्यालयास तसेच रोहयो उपजिल्हाधिकारी / जिल्हाधिकारी कार्यालयास केलेल्या पत्रव्यवहाराची, प्रस्तावाची पाहणी करावयाची असून आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती घ्यावयाच्या आहेत. जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबादच्या संगणकातील पत्रव्यवहार तसेच अन्य सर्व डाटा मला सीडीमध्ये देण्यात यावा.

तरी संबंधीत माहिती पाहण्यासाठी व झेरॉक्स करुन घेण्यासाठी तसेच संगणकातील डाटा घेण्याकरिता लागणा-या सीडीसाठी होणारा खर्च मी भरण्यास तयार आहे. तेव्हा वरील सर्व कागदपत्रे, सीडी, माहिती मला उपलब्ध करुन द्यावी ही विनंती. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २३-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले की, संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे सर्व माहिती उपलब्ध होईल त्यांच्याकडून माहिती घ्यावी. व त्याचबरोबर अपिलार्थीने परिच्छेद १ अन्वये मागणी केलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी प्रती पृष्ठ २ रुपये प्रमाणे एकूण ६२७ पृष्ठांचे मूल्य भरण्याचे अपिलार्थीस सूचित केले व त्याचबरोबर सदर १७ बाबींची माहिती ज्या वेबसाईटवर उपलब्ध आहे त्या वेबसाईचे पत्ते या पत्रामध्ये दिले आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि सदर सुनावणीस अपिलार्थी हे हजर राहिले नाहीत असे जन

माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर सांगितले. सुनावणीचे पत्र अपिलार्थीस पाठविले किंवा कसे हे पडताळण्याकरिता सदर पत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील दिनांक ०८-०५-२००६ अन्वये सदर पत्र पाठविले आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेला २ दिवसांचा अवधी हा अत्यंत अपुरा आहे, किंबहुना सदर पत्र अपिलार्थीस सुनावणीच्या तारखेनंतर मिळावे असा जन अपिलीय अधिकारी यांचा उद्देश असल्याची शक्यताही नाकारता येत नाही.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे टाळून त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यदक्षतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्या या वर्तनाची आयुक्त (कृषि) यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या दिनांक २४-०४-२००६ रोजीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता जन अपिलीय अधिकारी यांनी, या संदर्भात त्यांच्याकडील दिनांक १७-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीचे हे अपिल फेटाळण्याचा निर्णय देऊन त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविलेल्या दिनांक २३-०३-२००६ च्या पत्रामधील मजकुरास सहमती दर्शविली आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर सुनावणी घेतली नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०६-२००६ रोजी माहिती पुरविली आहे. त्यांच्या म्हणण्याप्रीत्यर्थ त्यांनी आयोगास त्यांच्या कार्यालयातील दिनांक २१-०६-२००६ रोजीचे ८७/०६ क्रमांकाचे एक पत्र दाखविले. या पत्रावर अपिलार्थीस माहिती मिळाल्याची पोहोच आहे. या व्यतिरिक्त अधिक काहीही सांगावयाचे नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, वरील घटनाक्रम व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, अपिलार्थीस मुळात, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये कितपत स्वारस्य होते याची आयोगास शंका आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असून, अपिलार्थीने यामध्ये काही माहिती लिखीत स्वरुपात मागितली आहे तर काही माहितीमध्ये जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने जिल्हाधिकारी कार्यालय, उपजिल्हाधिकारी रोहयो यांच्या कार्यालयाकडे केलेल्या प्रस्तावाच्या पाहणीची मागणी केली आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, त्यांनी विनंती केल्याप्रमाणे सदर नस्त्या दाखविल्या किंवा कसे हे आयोगास कळण्यास काही मार्ग नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीमध्ये व त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये काहीही भाष्य केलेले नाही. अपिलार्थीने दिनांक २७-०२-२००६ रोजी मागणी केलेल्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २३-०३-२००६ च्या पत्राव्दारे उत्तर दिले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असल्याचे निर्देशित केले आहे व त्याचबरोबर अपिलार्थीने मागितलेली माहितीपैकी

मुद्दा क्रमांक १ ची माहिती ६२७ पृष्ठांची आहे असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस संबंधीत मंडळ कृषि अधिकारी हे स्वतः माहिती अधिकारी असल्याने त्यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याची सूचना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीशी पूर्णपणे विसंगत आहे. या प्रकरणी त्यांनी संबंधीत मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये देणे भाग आहे. तथापि त्यांनी तसे न करता अपिलार्थीस मंडळ कृषि अधिकारी यांच्याकडे परस्पर जाण्याची सूचना देऊन या प्रकरणातील आपली जबाबदार टाळल्याचे आयोगाचे मत आहे. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस दिनांक २३-०६-२००६ रोजी माहिती देतांना एकूण ३० पृष्ठांची माहिती अपिलार्थीस दिल्याचे म्हटले आहे. माहिती नक्की किती पृष्ठांची होती याची माहिती जन माहिती अधिकारी आज आयोगासमोर देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेले दिनांक २३-०३-२००६ रोजीचे पत्र व दिनांक २३-०६-२००६ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता ही दोन्ही पत्रे विसंगतीपूर्ण विधानाने भरली आहेत असे आयोगाचे मत आहे. किंबहुना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच माहिती दिली आहे किंवा कसे, हे देखील शंका घेण्यास भरपूर वाव आहे असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेल्या विसंगतीपूर्ण माहितीबद्दल ते प्रचलीत सेवानियमाप्रमाणे प्रशासकीय कारवाई करण्यासाठी पात्र आहेत असे आयोगाचे मत आहे.

सबब आयुक्त (कृषि) यांनी, या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस नेमकी त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दिली किंवा कसे याची सखोल चौकशी करुन आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयुक्त (कृषि) यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती दिली किंवा कसे याची सखोल चौकशी करुन आवश्यक वाटल्यास जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, २७ / ५२५, माणिक चौक, माणिकनगर, उस्मानाबाद

२ सहाय्यक प्रशासन अधिकारी, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ कृषि उप संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त, (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, शिवाजीनगर, पुणे – ०५ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४३

निर्णय दिनांक ११-१२-२००७

१ श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, : अपिलार्थी
एन. डी. ४२, जे ३ / ५३ / ६, विद्या निकेतन
हायस्कूल समोर, हडको,
नवीन नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा उप संचालक, (आरोग्यसेवा), परिमंडळ,
लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप संचालक, आरोग्य सेवा (क्षय व बी.

सी. जी.), सेंट जॉर्ज हास्पिटल आवार,

आरोग्यभवन, मुंबई – ०१

प्रत्यक्षात : जन माहिती अधिकारी : मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर व जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, आरोग्य सेवा हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य सेवा श्री. रमेश सोमवार बन (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, आरोग्य सेवा (क्षय व बी. सी. जी.), नायडू हास्पिटल आवार, पुणे श्री. विठ्ठल गोबरु येवले हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ आपण मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय नांदेड यांना चौकशी करण्याचे पत्र दिले होते. त्यांनी आपणास दिलेल्या चौकशीच्या अहवालाच्या प्रती व आपण संबंधितांवर केलेली कार्यवाही याची प्रती देण्यात याव्यात.”

अपिलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस असे कळविले की, डॉक्टर एस. ए. मोरे यांच्या तक्रारीबाबतची चौकशी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन होणार असून चौकशी पूर्ण होताच त्या अहवालाची प्रत अपिलार्थीस पाठविण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, प्राप्त झालेल्या या उत्तराने समाधान न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १२-०७-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. अपिलार्थीने सदर अपील उप संचालक आरोग्य सेवा (क्षय व बी. सी. जी.) मुंबई यांच्याकडे केले होते. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेऊन अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००६ रोजीच्या पत्राव्दारे उप संचालक परिमंडळ तथा अपिलीय अधिकारी लातूर यांच्याकडून माहिती घेण्यासाठी सूचित केले. उप संचालक आरोग्य सेवा मुंबई यांची ही कृती चुकीची असून त्यांनी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज -- उप संचालक आरोग्य सेवा लातूर -- जे या प्रकरणी प्रत्यक्षात जन अपिलीय अधिकारी आहेत त्यांच्याकडे पाठवावयास हवा होता. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती केली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १८-०८-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांचे जे म्हणणे लेखी स्वरुपात मांडले आहे तोच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड व जिल्हा शल्य चिकित्सक, नांदेड यांच्याकडून प्राप्त करुन घ्यावयाची आहे. अपिलार्थी यांच्याकडून प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या प्रती त्यांनी या अधिका-यांना पाठविल्या असून या तक्रारीसंदर्भात या संबंधित अधिका-यांकडून कोणताही अहवाल त्यांना आजतागायत प्राप्त झालेला नाही. संबंधित अधिका-याकडून चौकशी अहवाल प्राप्त न झाल्याने संचालकांनी सदर तक्रारीची चौकशी करण्यासंदर्भात उप संचालक आरोग्य सेवा (शुश्रुषा - पुणे) यांना सूचना दिली आहे. तदनंतर उपसंचालक पुणे आरोग्य सेवा यांनी या प्रकरणाची चौकशी करुन आपला चौकशी अहवाल सरळ संचालक आरोग्य सेवा यांचे कार्यालयाकडे पाठविला आहे. याची प्रत उपसंचालक आरोग्य सेवा लातूर यांच्याकडे उपलब्ध नाही. संबंधीत पत्रव्यवहाराच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज रोजी उपलब्ध नसल्याने त्यांना नक्की कोणत्या तारखेस चौकशीचे आदेश दिले व कोणत्या तारखेस चौकशी अहवाल प्राप्त झाला याची तारीख आयोगास सांगता आली नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे दिसून येते की, मुळात अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे आज देखील उपलब्ध नाही. कारण अपिलार्थीने मागितलेल्या चौकशी अहवालाशी संबंधीत प्रकरणाची मूळात चौकशी उपसंचालक पुणे यांनी केली असून त्यांनी तो अहवाल संचालक मुंबई यांना सादर केला आहे. तर अपिलार्थीने मागणी उपसंचालक लातूर यांच्याकडे केली आहे. उपसंचालक लातूर यांना या चौकशी अहवालाची प्रत प्राप्त झाली नसल्याने त्यांना ही

माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येत नाही. तथापि अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ मधील तरतुदीच्या आधीन राहून उपसंचालक आरोग्यसेवा लातूर यांनी उपसंचालक (शुश्रुषा – पुणे) यांच्याकडून प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संबंधितांकडून प्राप्त करुन घेऊन माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम ८ च्या तरतुदीच्या आधीन राहून ती अपिलार्थीस ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ११-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. रविंद्र जगन्नाथराव होटकर, एन. डी. ४२, जे ३ / ५३ / ६, विद्या निकेतन हायस्कूल समोर, हडको, नवीन नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य

सेवा, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३६

निर्णय दिनांक १२-१२-२००७

१ श्री. धन्यकुमार जिनदास अंबुरे, : अपिलार्थी

बाबानगर, कळंब,

जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब,

जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा. प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. धन्यकुमार जिनदास अंबुरे हे गैरहजर आहेत तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद श्री. प्रमोद हरिभाऊ सवाखंडे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय यांचे प्रतिनिधी रजा राखीव मुख्याधिकारी सौ. अनिता एस. भालेराव (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) तसेच त्रयस्त पक्षाचे श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे यांचे प्राधिकृत प्रतिनिधी श्री. सुनिल विनायकराव मगर रा. कळंब हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे या त्रयस्त पक्षासंदर्भात दिनांक ०१-०१-१९७८ ते २८-०२-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

१. “ श्री. चंद्रकांत बलभीमराव टोणगे यांनी नगरपरिषदमध्ये नांव लावण्यासाठी दिलेला अर्ज त्याची झेरॉक्स प्रत,

२. मुख्य अधिका-याने चंद्रकांत बलभीमराव टोणगे याचे नांव लावणेसाठी काढलेला जाहीरनामा झेरॉक्स सत्यप्रत.

३. मुख्य अधिकारी नगरपरिषद कळंब यांनी श्री. चंद्रकांत बलभीमराव टोणगे यांचे ८ अ रजिस्टरला नांव नोंदवावे असा काढलेला आदेश त्याची झेरॉक्स सत्यप्रत,

४.    जागेचा स्थळपहाणी पंचनामा व नकाशाची झेरॉक्स सत्यप्रत. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन, अपिलार्थीस असे कळविले की, “ चंद्रकांत बलभीम टोणगे विरुध्द धन्यकुमार जिनदास अंबुरे असे प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल तोपर्यत या कार्यालयास संपर्क करु नये.”

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या निर्णयासंदर्भात दिनांक २४-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले.

जन अपिलीय अधिकारी यांना केलेल्या या अपील अर्जामध्ये त्यांनी मुख्याधिकारी, नगरपालिका कळंब यांनी, त्यांची दिशाभूल केल्याने त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) अन्वये कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती करुन, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०५-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश दिनांक २३-०५-२००६ रोजी पारीत केले. या आदेशामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ७ दिवसात विनामूल्य माहिती पुरविण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले.

जन अपिलीय अधिकारी यांनी सदर अपिलावर दिलेल्या निर्णयामध्ये खालील प्रमाणे भाष्य केलेले आहे.

" प्रस्तुत प्रकरणात शासकीय माहिती अधिकारी यांनी न्यायालयात चालू असलेले प्रकरण क्रमांक २६१/०३ या प्रकरणाशी संबंधीत असलेली कोणतीही कागदपत्रे सुनावणीच्या वेळेस सादर केलेली नाही त्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट म्हणजे काय आहे याचा उलगडा होत नाही. तसेच प्रकरण जरी न्यायप्रविष्ट असले तरी सदर माहिती उघड करण्यास बंदी घातली याचा पुरावा देखील सादर केलेला नाही त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये न्यायालयाने अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती उघड करु नये असे आदेश दिल्याचे निदर्शनास येत नाही व ही बाब शासकीय माहिती अधिकारी यांनी सिध्द केली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती अपिलार्थी यांना नाकारता येत नाही. अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती शासकीय माहिती अधिकारी यांचे कार्यालयातील अभिलेख्याशी निगडीत आहे. नगरपरिषदेमधील नामांतरासाठी दिलेला अर्ज व त्याचेवर झालेली कार्यवाही याची माहिती त्यांनी मागितलेली आहे. प्रस्तुत माहिती अपिलार्थी यांना देण्यास शासकीय माहिती अधिकारी यांना कोणतीही अडचण असल्याचे निदर्शनास येत नाही त्यामुळे अपिलार्थी यांना माहिती नाकारण्याचा शासकीय माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य नाही."

जन अपिलीय अधिकारी यांच्या वरील भाष्यवरुन असे दिसून येते की, प्रथम सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याबाबत कोणताही ठोस पुरावा त्यांचेसमोर सादर केलेला नाही. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून तोंडी सुनावणीमध्ये आदेश मिळाल्यानंतर दिनांक ११-०५-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याबद्दल दिनांक ११-०५-२००६ रोजी कळविले. सदर पत्र अपिलार्थीस दिनांक ११-०५-२००६ रोजी प्राप्त झाल्याप्रीत्यर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या सदरील स्थळप्रतीवर पोहोच स्वाक्षरी केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध नसल्याचे कळविल्यावरुन व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याची व त्यांना विनामूल्य माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे जे लेखी म्हणणे सादर केले आहे तोच त्यांचा युक्तिवाद समजून अपिलाची सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मुख्याधिकारी कळंब नगरपरिषद या पदाचा कार्यभार दिनांक ०५-०१-२००७ रोजी अतिरिक्त कार्यभार म्हणून स्विकारला असून, त्यांच्याकडे मुळात भूम नगरपरिषद या पदाचा कार्यभार आहे. अपिलार्थीने माहितीसाठीचा अर्ज करण्याच्या वेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. अपिलार्थीने एकूण ४ मुद्दयावर माहिती मागविली असून त्यापैकी मुद्दा क्रमांक १ व २ संदर्भातील माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. कारण श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे यांनी नगरपरिषदेमध्ये नाव लावण्याकरिता कोणताही अर्ज केलेला नव्हता त्यामुळे अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ चे उत्तर निरंक असे आहे. चंद्रकांत बलभीम टोणगे यांनी नाव लावण्यासाठी अर्ज केला नसल्याने त्यांचे नाव लावण्यासाठी जाहीरनामा काढण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ चे उत्तरही निरंक असे आहे. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही खुलासा केला की, नमुना ८-अ या प्रपत्रामध्ये नागरिकांच्या ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्तेच्या सर्वसाधारण नोंदी घेण्यात येतात. जर सदर मालमत्ता ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये येत असेल तर तिची नोंद नमुना ८ अ मध्ये व जर

संबंधीत मालमत्ता नगरपरिषदेच्या हद्दीत येत असेल तर त्या मालमत्तेची नोंद प्रॉपर्टी टॅक्स रजिस्टरमध्ये घेतली जाते. श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे यांना तहसीलदार कळंब यांच्याकडून पुनर्वसन योजने अंतर्गत कळंब नगरपरिषदेच्या हद्दीत २००० चौरस फूट इतक्या क्षेत्राची जागा मिळाली आहे. शासनातर्फे पुनर्वसन करत असतांना ज्या व्यक्तींना जागा दिली जाते, अशा व्यक्तीचे नाव तालुका निरीक्षक भूमी अभिलेख व तहसीलदार यांच्यामार्फत त्यांच्याकडे कळवण्यात येते. त्याकरिता संबंधीत व्यक्तीने अर्ज करण्याची जरुरी नसते. तहसीलदार व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून यादी प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषद, यादीतील माहितीप्रमाणे संबंधीतांच्या जमीनीच्या मालकीहक्काची नोंद पी. टी. आर. रजिस्टरला घेते. या प्रकरणी अपिलार्थीने मुद्दा क्रमांक ३ मध्ये ८-अ रजिस्टरच्या प्रतीचा संदर्भ दिला आहे तो संदर्भ कळंब नगरपरिषद क्षेत्राला ते ग्रामपंचायत हद्दीत नसल्याने, लागू होत नाही. त्यामुळे या नमुन्यातील माहिती कळंब नगरपरिषदेत असणार नाही हे वरील विवेचनावरुन दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचा मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भातील जागेची स्थळपहाणी व नकाशाची झेरॉक्स प्रत ही माहिती नगर रचनाकार उस्मानाबाद व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कळंब यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्याने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

जर वरीलप्रमाणे अपिलार्थीने मागितलेल्या एकूण ४ मुद्दयावरील माहितीपैकी ३ मुद्दयावरील माहिती जन माहिती यांच्याशी संबंधीत नव्हती तर, त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज नगर रचनाकार उस्मानाबाद व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कळंब यांच्या कार्यालयाकडे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत का पाठविला नाही असे त्यांना विचारले असता त्यांनी, सदरची कारणे त्यांना आता सांगता येणार नाही असे आयोगासमोर सांगितले.

त्रयस्त पक्षकार श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे यांचे प्राधिकृत प्रतिनिधी श्री. सुनिल मगर यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे यांनी

नगरपरिषदे कडे संबंधीत जमिनीवर नाव लावण्यासाठी कोणत्याही प्रकारे अर्ज केलेला नव्हता व सदर जमिनीवर नाव लावण्याची कारवाई तहसीलदार व नगर रचनाकार कार्यालयामार्फत करण्यात आलेली आहे. तद्वतच अपिलार्थीने मागितलेली माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची काहीही हरकत नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर पुढील कारवाई करण्यात येईल अशा प्रकारचे जे उत्तर दिले ते चुकिचे आहे. कारण न्यायालयात जे प्रकरण चालू आहे ते अपिलार्थी विरुध्द श्री. चंद्रकांत बलभीम टोणगे असे आहे. नगरपरिषदेची या प्रकरणात कोणत्याही प्रकारची पक्षकार म्हणून नोंदणी झालेली नाही. त्यामुळे नगरपरिषदेला हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे किंवा कसे हे अधिकृतपणे कळण्यास कोणताही मार्ग नाही. नगरपरिषदेने अपिलार्थीस दिलेल्या उत्तराच्या नस्तीचे अवलोकन करता आयोगास असे दिसून आले आहे की, संबंधीत लिपिकाने केवळ त्यांना अनाधिकृतरित्या मिळालेल्या माहितीच्या आधारे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची टिपणीत नोंद घेतली व सदर टिपणी तत्कालीन मुख्याधिकारी यांनी मान्य केली. टिपणी मान्य करतांना तत्कालीन मुख्याधिकारी यांनी या प्रकरणात, व माहिती अधिकार कायद्याचा अभ्यास केला नसल्याचे दिसून येत आहे. प्रकरण जरी न्यायप्रविष्ट असले तरी जी माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ च्या तरतुदीनुसार देता येत नाही अशा प्रकारची माहिती वगळून उर्वरीत माहिती अपिलार्थीस देण्यास काहीही हरकत नव्हती. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, यामध्ये जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे सदर माहिती उपलब्ध असेल तर ती अपिलार्थीस न देण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास दिसत नाही. जन माहिती

अधिकारी यांनी वर केलेल्या युक्तिवादामध्ये मुळात ही माहितीच त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती व त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत नव्हती त्यामुळे अपिलार्थीस ही माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता असे म्हटले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास जर उत्तर दिले असते तर ते संयुक्तीक ठरले असते. तथापि त्यांनी सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचे अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २०-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा कोणताही पुरावा ते जन अपिलीय अधिकारी यांच्या समोरही सादर करु शकले नाहीत.यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारे उत्तर दिले हे निःसंशयपणे सिध्द होत आहे. अपिलार्थीस दिशाभूल करणारे उत्तर देऊन संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेजबाबदारपणा सिध्द केला आहे व याव्दारे ते माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीस पात्र ठरत आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेवर संचालक नगरपालिका प्रशासन यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) महिन्याच्या आत करुन आपला अहवाल तदनंतर आयोगास एक महिन्याच्या आत पाठवावा. अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील माहिती त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीच्या मुद्दा क्रमांक ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाची प्रत तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कळंब व नगर रचनाकर उस्मानाबाद यांच्याकडे पाठवून सदर माहिती त्यांच्याकडून विहित मुदतीत हस्तगत

करुन ती अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी. तद्वतच अपिलार्थीस पी. टी. आर. ची त्यांचेकडे उपलब्ध असलेली झेरॉक्स प्रत त्याचबरोबर पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांचेवर संचालक नगरपालिका प्रशासन यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच ३ (तीन) महिन्याच्या आत करुन, आपला अहवाल तदनंतर एक महिन्याच्या आत आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. धन्यकुमार जिनदास अंबुरे, बाबानगर, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, कळंब, जिल्हा उस्मानाबाद

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त तथा संचालक, नगर परिषद संचालनालय, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई– ४०० ०३० यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३७

निर्णय दिनांक १२-१२-२००७

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, : अपिलार्थी

२७ / ५२५, माणिक चौक, माणिकनगर,

उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, तुळजापूर,

जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद

## <u>निर्णय</u>

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे हे गैरहजर आहेत, तर जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर श्री. सखाराम चंपतराव येवलीकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद श्री. विकास वामनराव नाईक (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक १२-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

> “ तालुक्यातील टक्केवारीनुसार गावनिहाय / विक्रेतानिहाय केरोसीन निश्चिती केलेल्या पत्रकाच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. तसेच गॅसधारक व कार्डधारकांच्या संख्येची ताजी माहिती असलेल्या माहितीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी. तसेच केरोसीन वितरक व जिल्हा पुरवठा अधिकारी तसेच अपर जिल्हाधिकारी कार्यालयाला केलेल्या पत्रव्यवहाराची पाहणी करावयाची असून आवश्यक त्याच्या झेरॉक्स प्रती घ्यावयाच्या आहेत. तसेच कार्यालयाच्या संगणकातील सर्व माहिती (डाटा) मला सी. डी. व्दारे देण्यात यावी. जिल्हास्तरीय नियतनात तुळजापूर तालुक्यातील ज्या अर्धघाऊक व किरकोळ केरोसीन विक्रेत्यांचा समावेश आहे त्या सर्व वितरकांचे स्टॉक

व विक्री रजिस्टर, विक्रीच्या कार्डनिहाय पावत्या, केरोसीन परवान्याची व अर्धघाऊक विक्रेत्यांच्या साठा परवान्याची पाहणी करावयाची असून आवश्यक त्याच्या झेरॉक्स प्रती घ्यावयाच्या आहेत. तरी संबंधीत माहिती पाहण्यासाठी व झेरॉक्स करुन घेण्यासाठी होणारा खर्च मी भरण्यास तयार आहे. तेव्हा वरील सर्व कागदपत्रे मला उपलब्ध करुन द्यावीत ही विनंती."

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने विचारलेली माहिती पाहता, सदर माहितीचे स्वरुप व व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागितलेल्या माहितीमध्ये अर्धघाऊक व किरकोळ केरोसीन विक्रेत्याचे स्टॉक व विक्री रजिस्टर, विक्रीच्या कार्डनिहाय पावत्या इत्यादी प्रकारचा तपशील अपेक्षिला आहे हे पाहता अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती लक्षात येते.

अपिलार्थीने मागितलेली माहिती तालुक्यातील अर्धघाऊक विक्रेत्यांशी संबंधीत असल्याने, जानेवारी २००५ ते नोव्हेंबर २००५ या कालावधीत वितरीत केलेला केरोसीन स्टॉक व विक्री रजिस्टरच्या पावत्या तसेच केरोसीन परवाना व साठा परवान्याच्या झेरॉक्स प्रती सादर करण्याचे जन माहिती अधिकारी यांनी तालुक्यातील सर्व अर्धघाऊक विक्रेत्यांना दिनांक १३-१२-२००५ रोजीच्या पत्राने कळविले व या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस देखील दिली होती.

नेमून दिलेल्या कालावधीत अर्धघाऊक विक्रेत्यांकडून माहिती न आल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात दिनांक १९-१२-२००५ रोजी सर्व संबंधीतांची बैठक बोलाविल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न मिळाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१)

च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७-०२-२००६ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय दिनांक ०९-०३-२००६ रोजी पारीत केला. यामध्ये त्यांनी अपिलार्थीचे अपील मंजूर करुन, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनाविलंब माहिती पुरविण्याचे आदेशीत केले आहे.

मध्यंतरीच्या काळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती तयार असून आपण ती व्यक्तिशः येऊन घेऊन जावी असे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १७-०२-२००६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या आदेशास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०९-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थीस परत त्यांनी मागितलेली माहिती हस्तगत करण्याकरिता त्यांच्या कार्यालयात दिनांक १६-०३-२००६ रोजी आमंत्रित केले. सदर पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९-०३-२००६ रोजी पाठविले. तदनंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक १६-०३-२००६ रोजी, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हस्तगत करण्याकरिता उपस्थित राहिले. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती स्विकृत केली नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेली माहिती स्विकृत न केल्या प्रकरणाचा, जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६-०३-२००६ रोजी पंचनामा करुन त्याची एक प्रत आयोगास सादर केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध माहिती प्राप्त न करुन घेता, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य

माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या व्दितीय अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत याची नोंद घेण्यात येऊन त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांचे मांडलेले म्हणणे हाच त्यांचा युक्तिवाद समजून सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक १२-१२-२००५ रोजी माहितीची मागणी केल्याने, अपिलार्थीने मागितलेली माहिती गोळा करण्यासंदर्भात त्यांनी दिनांक १३-१२-२००५ रोजी तातडीने कारवाई करुन अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती तयार ठेवली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे माहिती व्यक्तिशः अपेक्षिली असल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पोस्टाने पाठविली नाही. तथापि ही माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस दिनांक १७-०२-२००६ रोजी कळविले आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही सांगितले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांनी विहित मुदतीत तयार केली होती. तथापि अपिलार्थीची वाट पाहून त्यांनी दिनांक १७-०२-२००६ रोजी अपिलार्थीस सदर माहिती व्यक्तिशः घेऊन जाण्यास कळविले. तथापि अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक त्या सूचना देऊनही माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कधीही गेले नाहीत. अपिलार्थीने सदर माहिती टपालाने आवश्यक नाही असे विशेषपणे नमूद केल्याने ही माहिती अपिलार्थीस त्यांनी टपालाने पाठविली नाही. जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतरही त्यांनी अपिलार्थीस दिनांक १६-०३-२००६ रोजी ही माहिती प्राप्त करुन घेण्यासंदर्भात पत्र लिहिले तथापि अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात हजर राहूनही ही माहिती प्राप्त करुन घेतली नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, अपिलार्थीच्या अपील अर्जावर त्यांनी वेळेतच सुनावणी घेऊन निर्णय दिलेला आहे. त्यांनी देखील

अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्याकडे विहित मुदतीत तयार करुन ठेवली होती तथापि सदर माहिती व्यक्तिशः प्राप्त करुन घेण्याकरिता अपिलार्थी न आल्याने अपिलार्थीस ही माहिती प्राप्त होऊ शकली नाही असे सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, अपिलार्थी यांची सुनावणीस अनुपस्थिती, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद पाहता, अपिलार्थीने मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत तयार होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वेळीच सूचना देऊन देखील अपिलार्थीने सदर माहितीचा स्विकार केला नाही. दिनांक १६-०३-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहूनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेली माहिती स्विकृत केली नाही. त्याचा पंचनामा देखील जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केला आहे. या सर्व घटनाक्रमावरुन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळविण्यात फारसे स्वारस्य नसावे असे दिसून येते. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना माहिती दिली नसल्याचा उल्लेख केला आहे. तो जन माहिती अधिकारी यांनी वर उल्लेख केल्याप्रमाणे असत्य आहे. कारण अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करण्यापुर्वीच जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस सर्व माहिती उपलब्ध असून ती घेऊन जाण्याचे २ वेळेस कळविले होते. तथापि अपिलार्थीने ती माहिती स्विकारली नसल्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी ठोस पुरावा आयोगासमोर सादर केला आहे. आयोगाकडे जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेला पुरावा पाहता, अपिलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती-मध्ये फारसे स्वारस्य नसावे हे आयोगाचे गृहितक सिध्द होत आहे. त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील हे फेटाळण्यायोग्य आहे या निर्णयाप्रत आयोग आला आहे.

सबब, वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, २७ / ५२५, माणिक चौक, माणिकनगर, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४०

निर्णय दिनांक १२-१२-२००७

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा,<br>रा. श्री. तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम जवळ,<br>उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा अवर सचिव (भाग २) आस्थापना २,<br>ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,<br>मुंबई – ३२ | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा सह सचिव / उप सचिव, ग्रामविकास विभाग<br>मंत्रालय, खोली क्रमांक १४५, मुख्य इमारत,<br>मुंबई – ३२ | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

जन अपिलीय अधिकारी : उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई

**<u>निर्णय</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा (यापुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय श्री. नारायण गणपतराव क्षिरसागर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय श्री. रशीद गफूर सय्यद (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना देय असलेल्या रकमेसंदर्भातील प्रस्तावाच्या मंजुरीसंबंधात दिनांक १०-०३-२००१ ते ३१-०१-२००६ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली आहे.

“ १) नमुना पत्र अ (पहा १) माहितीचा अधिकार अर्ज दिनांक ०४-०४-२००५

२) शासन पत्र झेड जी ओ ७१०० / प्रक. ९१(भाग २) अस्थापना २ ग्रामविकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई ३२ (मा. त्रि. वा. मेडाम साहेब अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सहिनिशी चे पत्र दि. १३ एप्रिल २००५ व आपल्या सहिनीशीचे पत्र गोपनीय तात्काळ दि. १६ ऑगस्ट २००५ संदर्भादीन पत्रान्वये श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा रा. उस्मानाबाद यांच्या रु. २,९८,००० /- इतक्या थकीत रकमेचे प्रदान न केल्याबाबत व त्यास जबाबदार असलेल्या संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर आपल्या अस्थापना विभागाकडून काय कार्यवाही करण्यात आली त्याबाबतची कार्यालयीन टिपणी, माहिती व त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. तसेच

३) मे. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. विभाग उस्मानाबाद यांचे पत्रक क्रं. (अहवाल) जि.प.उ/बा.वी/सा/कावि/३५८४/०५ दि. २१-१०-०५ /

२५-१०-०५ मधील संदर्भ क्र. ६ (मा. तत्कालीन श्री. बी. के. नाईक साहेब मुकाअ जि. प. उस्मानाबाद यांचे सहिनीशी चे थकीत असलेली उर्वरीत रक्कम प्रदान करण्यासाठी दि. २०/२/२००१ रोजी मा. सचिव ग्रामविकास विभाग यांचेकडे मंजुरी बाबतचा प्रस्ताव पाठविला होता.) त्याबाबतचा अहवाल असून जो संदर्भ क्र. ६ दर्शविलेला आहे. त्यास आपल्या विभागाने मंजूरी दिली आहे काय. दिली नसेल तर विलंबाची कारणे नमूद करुन त्याबाबतची कार्यालयीन टिपणी दिनांक १०-०३-२००१ ते ३१-०१-२००६ पर्यत असलेल्या संबंधीत अधिकारी कर्मचारी यांच्या हस्ताक्षरातील माहिती व त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत ही विनंती.''

अपिलार्थीने सदर माहिती टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये उत्तर दिले. या पत्रासोबत त्यांनी कार्यालयीन टिपणी व त्याबाबतच्या कागदपत्राच्या प्रती जोडल्या होत्या व अपिलार्थीच्या माहितीच्या मागणीसंदर्भात काही खुलासा त्यांनी या पत्रामध्ये केलेला आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे या निर्णयासंदर्भात दिनांक ०१-०२-२००६ रोजी प्रथम अपील केले.

सदर अपिलाचे कारण, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या अर्जास कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही, असे दिले आहे व या अपील अर्जामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रशासकीय / दंडात्मक कारवाई करण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता त्यांच्याकडील दिनांक १७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस पत्र पाठवून, अपिलार्थीने मागितलेल्या माहितीवर अंतीम कारवाई प्रलंबीत असल्याने अपिलावर कारवाई करता येणार नाही असे कळविले.

जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या उत्तराने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २१-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन, जन अपिलीय अधिकारी यांच्यावर सेवानियमानुसार शिस्तभंगाची व दंडात्मक कारवाई करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपर्यत मिळाली नसून, संबंधीत जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे कारवाई व्हावी. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी जाणुन-बुजून व विलंबाने माहिती दिल्याबद्दल त्यांना शास्ती व दंडीत करावे, व त्याचबरोबर जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक १७-०३-२००६ च्या पत्रामध्ये अपिलार्थीबरोबर चर्चा झाल्याचा जो उल्लेख केला आहे, तो पूर्णपणे असत्य आहे त्यामुळे त्यांच्यावर देखील दंडात्मक कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीने दिनांक ०२-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक ०७-०३-२००६ रोजी पाठविली आहे. सदर माहिती दुस-या कार्यासनाशी संबंधीत असल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती देण्यास वेळ लागला. यावर अपिलार्थीचा अर्ज त्यांना

प्राप्त झाल्यानंतर, अपिलार्थीच्या अर्जावर संबंधीत कार्यासनाने अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली होती का असे विचारले असता त्यांनी त्यास नकारार्थी उत्तर दिले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद पाहता असे दिसून येते की, अपिलार्थीने मुळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितलेली आहे ती स्पष्ट स्वरुपात मागितलेली नाही. तीचे अवलोकन करता असे अनुमान काढणे शक्य आहे की, अपिलार्थीस रुपये २,९८,००० इतक्या थकीत रक्कमेचे प्रदान न करण्यास जबाबदार असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर आस्थापना विभागाने काय कारवाई केली याचा तपशील, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांनी दिनांक २०-०२-२००१ रोजी सचिव (ग्रामविकास) यांच्याकडे जो प्रस्ताव पाठविला आहे त्या प्रस्तावाच्या सद्यस्थितीची माहिती अपिलार्थीस अपेक्षित आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दिनांक ०७ मार्च २००६ रोजीच्या पत्रामध्ये, अपिलार्थीच्या प्रस्तावावर अंतीम निर्णय झाल्यानंतर जर या प्रकरणामध्ये कोणी व्यक्ती दोषी आढळली तर त्यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात आवश्यक तो निर्णय घेण्यात येईल असे म्हटले आहे. तद्वतच या पत्रासोबत त्यांनी कार्यालयीन टिपणीच्या प्रतीही अपिलार्थीस पुरविल्या असल्याचे दिसून येते.

या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास असे सांगण्यात आले की, अपिलार्थी यांचा वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांनी उस्मानाबाद जिल्हापरिषदेबरोबर १९८४-८५ या आर्थिक वर्षामध्ये सिमेंट वाहतुकीसंदर्भात ३९ पैसे प्रती टन प्रती किलोमिटर या दराने करार केला होता. या करारातील तरतुदीप्रमाणे त्यांनी सिमेंटची वाहतूक उस्मानाबाद जिल्ह्याकरिता केली. तथापि सदर दर अपिलार्थीस मान्य नव्हते. त्यांनी ७७ पैसे प्रती टन असे दर मागितले होते व त्याप्रमाणे जिल्हा परिषदेस करार करण्याच्या दिवशीच लेखी निवेदन दिले होते. अपिलार्थीने देयक त्यांना वाढीव दराने मंजूर

करण्यासाठी तदनंतर, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांच्याकडे वेळोवेळी पत्रव्यवहार केला. तथापि अपिलार्थीची विनंती त्यावेळी कोणत्याही प्रकारे मान्य करण्यात आली नव्हती. तदनंतर आलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी जिल्हा परिषदेच्या विधी सल्लागाराशी सल्लामसलत करुन अपिलार्थीस वाढीव दराने बील अदा करण्यासंदर्भात एक प्रस्ताव शासनाकडे २००१ साली पाठविला होता. सदर प्रस्तावाच्या मान्यतेकरिता अपिलार्थी हे प्रयत्नशील असून, अपिलार्थीच्या या प्रस्तावावर शासनाने दिनांक १७-०७-२००१ रोजी निर्णय घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पाठविला व वाढीव दराचा प्रस्ताव अंतीमतः अमान्य केला. यानंतरही अपिलार्थीची त्यांच्या वाढीव दर मंजुरीबाबत सतत मागणी चालू आहे. सदर प्रकरण शासनाने आता दप्तरी दाखल केले आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणी कोणत्याही कर्मचा-यावर अथवा अधिका-यावर कोणत्याही प्रकारची शिस्तभंगविषयक कार्यवाही केलेली नाही.

आयोगास असे आढळून आले आहे की, या प्रकरणी शासनातर्फे अंतीम निर्णयाची कारवाई पूर्ण झाली असून, अपिलार्थीस अद्यापही त्यांच्या प्रस्ताव मान्यतेस विलंब लावणा-या कर्मचा-यांवर शासनाने काय कारवाई केली याची माहिती हवी आहे. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणासंदर्भातील नस्तीच्या सर्व पृष्ठांच्या झेरॉक्स प्रती दिलेल्या आहेत.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, अपिलार्थीचा प्रस्ताव अंतीमतः शासनाने ज्या नस्तीवर नामंजूर केला आहे त्या नस्तीच्या अपिलार्थीस आवश्यक असलेल्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याकरिता एकूण ३५ दिवसांचा विलंब लावून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे

त्याबद्दल त्यांच्यावर सचिव (ग्रामविकास विभाग) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीच्या अपील अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास दिसून आले आहे. जन अपिलीय अधिकारी यांची अपील ठरविण्याची ही पध्दत बरोबर नसून, त्यांनी येथून पुढे माहितीचा अधिकार अधिनियमाअंतर्गत दाखल झालेल्या अपिलावर निर्णय देतांना जन माहिती अधिकारी व अपिलार्थी या दोघांनाही एकत्र बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून आपला अंतीम निर्णय पारीत करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. जन अपिलीय अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची अधिकारिता माहिती आयोगास नसल्याने जन अपिलीय अधिकारी यांना दंडीत करण्याची अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येत नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या प्रस्तावावर शासनाने अंतीमतः दिलेल्या निर्णयासंदर्भातील सर्व उपलब्ध कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस माहिती देण्याकरिता एकूण ३५ दिवसांचा विलंब लावून आपल्या कार्यशैलीमध्ये दर्शविलेल कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर सचिव (ग्रामविकास विभाग) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १२-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अनिलकुमार विपिनचंद अजमेरा, रा. तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम जवळ, उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (ग्रामविकास विभाग) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३४

निर्णय दिनांक १३-१२-२००७

१ श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, : अपिलार्थी

नेहरु रोड, पूर्णा, तालुका पूर्णा,

जिल्हा परभणी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय

दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय,

परभणी

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. शफीउर रहमान अजीजूर रहमान कुरेशी (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी यांचे प्रतिनिधी लिपीक श्री. भानुदास रामकिशन वटाणे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलाच्या सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांनी स्वतः हजर न राहता, त्यांचे कार्यालयाचे कनिष्ठ लिपीक श्री. भानुदास रामकिशन वटाणे यांना आयोगाकडील सुनावणीस हजर राहण्यासाठी प्राधिकृत केले आहे. आयोगाकडील सुनावणीस कनिष्ठ लिपिकास पाठविण्याची त्यांची कृती त्यांच्या बेजबाबदारपणाचे दर्शन घडविते. सबब

येथून पुढे, त्यांनी आयोगाची सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्यानंतर आयोगाच्या पूर्वपरवानगी-शिवाय गैरहजर राहू नये अशी सूचना सचिव, (महसूल) यांनी त्यांच्या स्तरावरुन जन अपिलीय अधिकारी यांना द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २१-०१-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे २६ जुलै २००५ ते २१ जानेवारी २००६ पर्यंतच्या कालावधीत पूर्ण शहरात पूरग्रस्तांना वाटप झालेले सानुग्राह अनुदान, पडझडीची मदत, धान्य व केरोसीन वाटपाबातची खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. पूर्णा शहरात पूरक्षेत्राच्या कायम केलेल्या सीमा किंवा नकाशा प्रत,

२. मदत वाटपाबाबत शासन निर्णयाची प्रत (जी. आर.),

३. पूर्णा शहरासाठी उपलब्ध निधी किती ? पैकी वाटप किती ?

४. पूर्णा शहरात मदत वाटप झालेल्या लाभार्थीची यादी (नांव, पत्ता, दिनांक, रक्कम, धान्य व केरोसीन सहीत)

५. पंचनामे केलेल्या पण मदत दिली नाही अश्या पात्र लाभार्थीची यादी व मदत न देण्याचे कारण काय ? मदत द्यावयाची असल्यास आपली योजना काय?”

अपिलार्थीने सदर माहिती नोंदणीकृत टपालाने अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने मागितलेली माहिती त्यांना देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये १६८० त्यांच्या कार्यालयास जमा करण्याचे सूचित केले आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगासमोर सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अर्ज

जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक २३-०३-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपील अर्जाच्या छायाप्रतीतील त्यांच्या अभिप्रायावरुन दिसून येते.

सदर अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०४-२००६ रोजी सुनावणी ठेवली होती. सुनावणीसाठी हजर राहण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांचे पत्र दिनांक ३१-०३-२००६ रोजीचे आहे. सदर पत्र त्यांनी दिनांक ०३-०४-२००६ रोजी पोस्टात टाकले. अपिलार्थीस ते पत्र दिनांक ०५-०४-२००६ रोजी प्राप्त झाल्यामुळे अपिलार्थी सदर सुनावणीस हजर राहू शकले नाहीत. अपिलार्थीने त्यांना, जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेले पत्र वेळेत प्राप्त झाले नसल्याचे उपविभागीय अधिकारी यांना त्यांच्याकडील दिनांक १२-०५-२००६ रोजीच्या पत्रान्वये निदर्शनास आणले आहे. दिनांक ०३-०४-२००६ रोजीची कथित सुनावणी झाली किंवा कसे हे कळण्यास, आयोगास मार्ग नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीस, त्यांच्याकडील दिनांक ०८-०६-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले की, “ आपण मागणी केलेल्या माहितीसंदर्भात तहसीलदार पूर्णा यांनी त्यांचे पत्र क्रमांक २००६/माअ/कावि, दिनांक ३०-०१-२००६ अन्वये आपणास सदर माहितीपोटी होणारी फीस रुपये १६८० जमा करणेस कळविले होते परंतु आपण सदर रक्कम जमा केली नाही म्हणून माहिती पुरविण्यात आली नाही. प्रकरणात आपण नियमाप्रमाणे फी भरणा केल्यास आपणास तहसीलदार पूर्णा यांच्याकडून त्वरीत माहिती पुरविण्यात येईल. ” अपिलार्थीस याप्रमाणे कळवून जन अपिलीय अधिकारी यांनी शेवटी अपिलार्थीचे अपील निकाली काढले आहे. सदर अपील निर्णय देखील अपिलार्थीस प्राप्त झाला नाही असे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये आयोगासमोर कबूल केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलावर काय निर्णय दिला तो न कळल्याने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या

तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी हिच माहिती त्यांच्याकडील दिनांक ०३-०८-२००५ व दिनांक १३-०९-२००५ रोजीच्या पत्रान्वये, जन माहिती अधिकारी यांना महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ मधील तरतुदीनुसार मागितली होती. तथापि त्यावेळी देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. मध्यंतरीच्या काळात महाराष्ट्र माहितीचा अधिकार कायदा निरसीत झाल्याने, त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमामधील कलम ६ (१) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे परत त्याच माहितीची मागणी केली. त्यांच्या सदर माहितीच्या अर्जास जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांच्या दिनांक ०५-०४-२००६ रोजीच्या सुनावणीस हजर राहण्याच्या पत्राशिवाय कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना कोणतीही माहिती दिली नाही अथवा माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी लागणा-या शुल्काचा भरणा करण्यासंदर्भात त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतेही पत्र प्राप्त झाले नाही. तद्वतच, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील, अपिलाच्या सुनावणीची तारीख उलटून गेल्यानंतर सुनावणीस हजर राहण्यासंबधात पत्र दिनांक ०५-०४-२००६ रोजी पत्र पाठविले. त्यांच्या अपिलावर काय निर्णय झाला हे देखील जन अपिलीय अधिकारी यांनी, त्यांना अद्यापपावेतो कळविले नाही. महसूल विभागातील पूर्णा तालुक्यातील महसूल विभागाचे कर्मचारी नागरिकांना कोणत्याही प्रकारचा सकारात्मक प्रतिसाद देत नाहीत. त्यांनी पूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियमाखाली उपविभागीय अधिकारी परभणी यांचे कार्यालयात अपील केले असता, उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयाने तो अपील अर्ज

स्विकृत करण्यास देखिल नकार दिला होता. या प्रकरणी त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे दाद मागूनही काही उपयोग झाला नाही.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी नायब तहसीलदार (पुरवठा) श्री. शफीउर रहमान अजीजूर रहमान कुरेशी हे सुनावणी चालू असतांना १० वाजून ३० मिनिटांऐवजी १२ वाजून ०५ मिनिटींनी आयोगासमोर साक्षीस उपस्थित झाले.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस रुपये १६८० /- इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयास भरण्यास सूचित केले होते. अपिलार्थीने सदर रक्कमेचा भरणा न केल्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याप्रीत्यर्थ आयोगाकडे, आयोगाने त्यांना पाठविलेल्या नोटीसमध्ये तशी स्पष्ट कल्पना देऊनही कोणताही पुरावा सादर केला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे म्हणणे आयोगास ग्राह्य धरता येणार नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीच्या अपिलावरील निर्णय त्यांना दिनांक ०८-०६-२००६ रोजी निर्गमीत केला होता. याशिवाय त्यांना जादा काही सांगावयाचे नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे दिसून येते की, या प्रकरणी मुळात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ३०-०१-२००६ रोजी पाठविले होते, हे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरण्याकरिता त्यांच्याकडे कोणताही पुरावा नाही, तर जन माहिती अधिकारी यांचे पत्र प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थी यांनी एका शपथपत्राव्दारे आयोगासमोर कबूल केले आहे. जन अपिलीय

अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दिनांक २३-०३-२००६ रोजीच्या अपील अर्जावर, अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३१-०३-२००६ रोजीच्या पत्राने सुनावणीसाठी दिनांक ०३-०४-२००६ रोजीच्या पत्राने त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याची सूचना देणारे पत्र दिनांक ०३-०४-२००६ रोजीच पोस्टात टाकले, जेणेकरुन अपिलार्थीस सुनावणीस हजर राहणे शक्य होणार नाही, अशा त-हेने त्यांनी जाणीवपूर्वक केलेले प्रयत्न, ही त्यांची कृती, त्यांच्या कार्यशैलीतील कार्य परायणतेचा अभाव स्पष्ट करते. जन अपिलीय अधिकारी हे उपविभागीय अधिकारी या दर्जाचे महसूल विभागाचे अधिकारी आहेत. त्यांच्याकडून अशा प्रकारचे वर्तन अपेक्षित नाही. तथापि त्यांनी या प्रकरणी जे वर्तन केले आहे त्याची नोंद महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग यांनी गांभीर्याने घेऊन त्यांच्यावर आवश्यक ती कारवाई करण्याचा त्यांनी विचार करावा असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

आज सुनावणीस देखील जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यापैकी कोणीही स्वतः हजर न राहता, त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ लिपीक दर्जाच्या कर्मचा-यास सुनावणीस पाठविले ते देखिल आयोगासमोर दोन तास उशीराने उपस्थित झाले. हे सर्व पाहता ते किती बेजबाबदारपणे वागू शकतात हे दिसून येते व त्यांची कृती त्यांच्या बेजबाबदारपणावर शिक्कामोर्तब करते याची नोंद आयुक्त महसूल, औरंगाबाद विभाग यांनी घ्यावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थी यांचे, त्यांना जन माहिती अधिकारी यांचे दिनांक ३०-०१-२००६ रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही, हे त्यांचे म्हणणे आयोग ग्राह्य धरत असून, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २३-०१-२००६ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागितलेली माहिती, अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तद्वतच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर पत्र पाठविल्याचा कोणताही पुरावा

सादर न केल्याने, त्यांनी अपिलार्थीस दिनांक ३०-०१-२००६ रोजीचे पत्र पाठविले नाही असे सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली आहे असे या ठिकाणी याप्रमाणे सिध्द होत आहे. सबब, सचिव (महसूल) यांनी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर, त्यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच ३ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामूल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर ७ दिवसाच्या आत सादर करावा.

३. संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर सचिव (महसूल) यांनी प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच ४ (चार) महिन्याच्या आत करुन तदनंतर आपला अनुपालन अहवाल आयोगास १ (एक) महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विश्वनाथ बाबुराव भायेकर, नेहरु रोड पूर्णा, तालुका पूर्णा, जिल्हा परभणी

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, पूर्णा, जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, (महसूल) मंत्रालय, मुंबई – ३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ आयुक्त महसूल, औरंगाबाद विभाग यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

७ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७३५

निर्णय दिनांक १३-१२-२००७

१ श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, : अपिलार्थी

नोमानियानगर, तरोडा (बु.),

नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा कार्यकारी अभियंता,
नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

## निर्णय

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री. राम संभाजीराव बिरादार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे प्रतिनिधी सहाय्यक अधीक्षक अभियंता श्री. सय्यद सिकंदर हाशमी (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे यांत्रिकी उपविभाग (उपसा सिंचन योजना) नांदेड या उपविभागातील कार्य व खर्चासंबंधी दिनांक ०१-०१-२००१ ते ३०-०६-२००१ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

“ १. यांत्रिकी संघटनेत नांदेड मुख्यालयी यांत्रिकी उप अभियंते / शाखा अभियंते / सहाय्यक अभियंते असतांना उस्मानाबाद येथील विद्युत उपविभागाचे शाखा अभियंता यांना यांत्रिकी उपविभाग (उ.सि.यो.) नांदेड या उप विभागाचे उप अभियंता पदाचे अतिरिक्त कार्यभार शासनाच्या कोणत्या नियमानुसार देण्यात आले याची माहिती द्यावी. सदर विद्युत शाखा अभियंता यांना यांत्रिकी उपविभागाचे अतिरिक्त कार्यभार देण्यास कोणी शिफारस केली त्यांच्या व्यतिरिक्त यांत्रिकी संघटनेत नांदेड मुख्यालयी दुसरा कोणी यांत्रिकी शाखा अभियंता / सहाय्यक अभियंता / उप अभियंता उपलब्ध नव्हते का याची माहिती द्यावी. सदर विद्युत अभियंता यांनाच या पदाचे अतिरिक्त कार्यभार का देण्यात आले याची माहिती द्यावी.

२. या उपविभागास वरील कालावधीत शासनाची कोणती कामे होती यांची सविस्तर माहिती द्यावी.

३. या उपविभागाने वरिल कालावधीत आपल्या विभागात एकूण किती अंदाजपत्रके मंजुरीकरिता सादर केली व एकूण किती अंदाजपत्रके आपल्या विभागाने मंजूर केली याबाबत सविस्तर माहिती जसे कामाचे नांव, अंदाजपत्रकातील कामाची एकूण रक्कम, मंजूर केलेली एकूण रक्कम.

४. या उपविभागाने वरिल कालावधीत पत मर्यादे अंतर्गत प्रत्येक महिन्यात एकूण किती खर्च केला त्याचा तपशील प्रत्येक प्रमाणकानुसार कामाचे नांव, प्रमाणकानुसार खर्च केलेली रक्कम.

५. उप उपविभागाने वरील कालावधीत विभागीय कार्यालयात प्रदानाकरिता एकूण किती देयके सादर केली याचा तपशील – फर्म चे नांव, देयक क्रमांक व दिनांक, कार्यादेशाचे क्रमांक व दिनांक, कामाचे नांव, देयकाची प्रदान केलेली

एकूण रक्कम, धनादेश क्रमांक व दिनांक, आणि या देयकासंबंधीत फक्त सर्व कार्यदेशाची छायाप्रत देण्यात यावी.

६. या उप विभागात वरिल कालावधीत एकूण किती शाखा अभियंते / सहाय्यक अभियंते कार्यरत होते. उपविभागात कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी / कामगारांचे नांव, पदनाम, केव्हापासून उपविभागात कार्यरत आहे तो दिनांक आणि त्यांना देण्यात आलेली कामे याबाबत माहिती द्यावी. ”

अपिलार्थीने सदर माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) प्रमाणे प्रथम प्रतिसाद देऊन, सदर माहिती प्राप्त करण्याकरिता प्रती पृष्ठ रुपये २ /- याप्रमाणे एकूण ६२ पृष्ठांकरिता रुपये १२४ /- इतकी रक्कम त्यांच्या कार्यालयास भरणा करण्याचे सुचविले. तथापि सदर रक्कमेचा भरणा अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केला नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. सदर पत्र अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक रजिस्टरची झेराक्स प्रत आयोगास सादर केली असून यावरुन त्यांनी अपिलार्थीस हे पत्र पोस्टाने दिनांक ०७-०३-२००६ रोजी पाठविल्याचे दिसून येते.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, माहिती न मिळाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत

नाही. तथापि त्यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांचे दिनांक २०-०४-२००६ चे पत्र प्राप्त झाल्यापासून २ दिवसाच्या आत आवश्यक ती फी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेल्या अपील अर्जाचा फक्त संदर्भ दिला आहे. सदर अपील त्यांनी मान्य केले किंवा निकाली काढले या संदर्भात त्यांनी कोणताही उल्लेख केलेला नाही.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी ते सदर शुल्क जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात भरण्यासाठी गेले असता, संबंधीत लिपिकाने कार्यकारी अभियंता व उप कार्यकारी अभियंता कार्यालयात हजर नसल्याने रक्कम स्विकारली नाही, व ही बाब त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांना लिहिलेल्या दिनांक २१-०४-२००६ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या निदर्शनास देखील आणून दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती न देऊन कसूर केला असल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) अन्वये प्रतिदिनी रुपये २५० /- इतकी शास्ती लावून त्यांना मोफत माहिती मिळावी अशी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तिवादाच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी त्यांचे म्हणणे आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिल अर्जामध्ये स्पष्टपणे मांडले असून, तोच त्यांचा युक्तिवाद धरावा. अपिलार्थी यांना त्यांनी कोणत्या लिपिकाकडे पैसे भरण्याची तयारी दर्शविली होती असे विचारले असता सदर लिपिकाचे नाव अपिलार्थी आयोगासमोर सांगू शकले नाहीत. परंतु ज्यावेळी ते सदर शुल्क रुपये १२५ /- भरण्यासाठी गेले होते त्यावेळी संबंधीत लिपीक हे मे. कविता स्टेशनरी नांदेड या फर्मच्या मालकाशी चर्चा करीत होते असे सांगितले.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांनी केलेल्या दिनांक २०-०२-२००६ रोजीच्या माहितीसाठीच्या अर्जास त्यांच्याकडील दिनांक ०७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला असून, त्यावर त्यांनी अपिलार्थीस परत दिनांक ३०-०५-२००६ रोजी स्मरणपत्र देखील दिले आहे. त्यांच्या कार्यालयातील प्रथम लिपीक श्री. व्यवहारे यांनी अपिलार्थी हे त्यांच्याकडे पैसे भरण्यास आले नाहीत असे सांगितले आहे. त्यामुळे ते अपिलार्थीस ही माहिती देऊ शकले नाहीत. तद्वतच अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः मागितली असल्याने त्यांनी ही माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी यांची प्रतिक्षा केली. जन माहिती अधिकारी यांनी पुढे असाही युक्तिवाद केला की, शेवटी त्यांनी दिनांक ३०-०५-२००६ रोजी अपिलार्थीस सदर माहिती तयार असून ती निर्धारीत शुल्क भरुन हस्तगत करण्याचे लेखी देखील कळविले आहे. अशाच अर्थाचे पत्र नांदेड पाटबंधारे मंडळ या कार्यालयामार्फत देखील अपिलार्थीस दिनांक १०-०५-२००६ व दिनांक २०-०४-२००६ रोजी दिले आहे. यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांचे कार्यालयात हजर राहून माहिती हस्तगत करण्याचे सूचित केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे, दोन्ही बाजुंनी केलेला युक्तिवाद व वरील घटनाक्रम पाहता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित मुदतीत प्रतिसाद दिला असून आवश्यक ते शुल्क त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले आहे. तथापि सदर पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे, तर सदर पत्र पोस्टाने पाठविल्याचा पुरावा जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला आहे. या प्रकरणी अपिलार्थीची माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता पैसे भरण्याची खरोखरच तयारी होती किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेतली असती तर, या बाबी त्याच वेळी स्पष्ट होऊन अपिलार्थीस माहिती मिळण्यासंदर्भात

यापूर्वीच ठोस निर्णय होऊ शकला असता. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपील विहित मुदतीत न ठरविल्यामुळे अपिलार्थीस माहिती आयोगाकडे धाव घ्यावी लागली आहे. जन अपिलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी या दोघांनाही बोलावून त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन त्या अपिलावर निर्णय देणे हे " अपील ठरविणे " या प्रक्रियेत अभिप्रेत होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही कृती या ठिकाणी केली नसल्याचे दिसून येते. तेव्हा येथून पुढे अपिलावर निर्णय देतांना, त्यांनी या पध्दतीचा अवलंब करावा असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करता असे आदेशीत करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क रुपये १२४ /- भरण्याची तयारी दर्शवूनही सदर शुल्क न स्विकारणा-या कर्मचा-यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व अपिलार्थीस या प्रकरणी संशयाचा फायदा देऊन, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती (जी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसेल ती माहिती) हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास जाणुन-बुजून व निःसंशयपणे टाळाटाळ केल्याचे आयोगास दिसून न आल्याने याबाबत त्यांच्यावर कारवाई करण्याचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती (जी माहिती, माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार "माहिती" या शब्दाच्या व्याख्येत बसेल ती माहिती) हे आदेश निर्गमीत होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने माहिती प्राप्त करुन घेण्यापोटी शुल्क भरण्याची तयारी दर्शवूनही, सदर शुल्क न स्विकारणा-या कर्मचा-यावर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एका महिन्याचे आत पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मोहीयुद्दीन मोईनुद्दीन फारुकी, नोमानियानगर, तरोडा (बु.), नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदेड पाटबंधारे विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत

मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७४८

निर्णय दिनांक १३-१२-२००७

| | | |
|---|---|---|
| १ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे,<br>सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन,<br>तालुका शाखा मुखेड,<br>व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन,<br>मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा. मेथी,<br>तालुका मुखेड, जिल्हा नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती<br>कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड,<br>जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-१२-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे (यापुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा. मेथी श्री. किशन संभाजी कांबळे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती श्री. पंडितराव गोविंदराव पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्वप्रथम त्यांच्याकडील दिनांक ०३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेस जानेवारी २००३ ते डिसेंबर २००६ या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या अनुदानाचा संपूर्ण तपशील खालील प्रमाणे मागितला होता.

> “ आपल्या शाळेस आलेल्या सर्व अनुदानाचा तपशीलवार माहिती संक्षिप्त प्रती देणे, व कोणकोणत्या योजनेतून अनुदान प्राप्त झाले आणि ते कशासाठी खर्च करण्यात आले याची सविस्तर माहिती देणे. उदा. शालेय बांधकामासाठी, शालेय रंगोटी, ऑफिस खर्च, शालेय साहित्य इत्यादी सर्व संक्षिप्त प्रतीत देणे. ”

अपिलार्थीने सदर माहिती रजिस्टर टपालाने मागितली होती.

सदर अर्ज जन माहिती अधिंकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०३-०३-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अर्जाच्या स्थळप्रतीच्या झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते.

अपिलार्थीच्या या अर्जावर संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद दिल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून, विहित मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदी अन्वये, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-०४-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपिलामध्ये त्यांनी, आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा-वरुन दिसून येते.

जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्या कडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने व्यथित होऊन, अपिलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदी अन्वये, राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी, आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आज झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती मिळविण्यामध्ये त्यांना आजही स्वारस्य आहे. सदर माहिती त्यांना लवकरात लवकर मिळावी व त्याचबरोबर ज्या जन माहिती अधिका-याने त्यांना अद्यापपर्यंत माहिती दिली नाही, त्यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० प्रमाणे यथायोग्य कारवाई व्हावी.

जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १९-०५-२००७ रोजी रुजू झाले असून अपिलार्थीने मागितलेल्या माहितीची त्यांना कोणतीही कल्पना नव्हती. अपिलार्थीने काही माहिती मागितली आहे याची कल्पना त्यांना आयोगाचे सुनावणीसाठीचे पत्र प्राप्त झाल्यानंतर झाली.

जन अपिलीय अधिकारी यांच्यातर्फे असा युक्तिवाद करण्यात आला की, ते या पदावर दिनांक १८-०९-२००६ रोजी रुजू झाले असून त्यांच्या कार्यालयामध्ये त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपिलाचा शोध घेऊनही ते त्यांना प्राप्त होऊ शकले नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व उपस्थित जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकता, नांदेड जिल्हा परिषदेचा कारभार कसा व कोणत्या दिशेने चालला आहे याचे पुरेपूर दर्शन होते. संबंधीत जन माहिती अधिका-याने अपिलार्थीच्या मूळ अर्जावर कोणतीही कारवाई केली नाही तर जन अपिलीय अधिकारी यांना त्यांचे कार्यालयात अपिलार्थीने केलेल्या प्रथम अपिलाची प्रत मिळू शकली नाही. जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी हे नवीन रुजू झाले आहेत असा त्यांचा दावा आहे. तथापि त्यांनी कार्यभार स्विकारतांना संबंधितांकडून आवश्यक ती कागदपत्रे स्विकृत करुन पदभार घ्यावयास हवा होता व जर त्यांच्या पुर्वीच्या कर्मचा-याने त्यांना आवश्यक ते अभिलेखे हस्तांतरित केली नसतील तर ही बाब त्यांच्या वरिष्ठांच्या नजरेस आणावयास हवी होती. तथापि, या दोन्ही अधिका-यांनी आयोगाकडे केलेल्या युक्तिवादावरुन त्यांनी अशी कोणतीही कृती केल्याचे दिसून येत नाही तसेच या दोन्ही अधिका-यांच्या कार्यालयामध्ये अभिलेखे व रेकॉर्ड विस्कळीत झाले असल्यासारखे वाटते. अर्थात हे सर्व विस्कळीत होण्यास तत्कालीन माहिती अधिकारी व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी हे जबाबदार आहेत. या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी सदर प्रकरण त्यांच्या काळात झाले नसून ते दिनांक १८-०९-२००६ रोजी रुजू झाले असल्याने व त्यांनी शोध घेऊनही अपिलार्थीचा अपील अर्ज त्यांना प्राप्त झाला नाही हा केलेला युक्तिवाद आयोग अमान्य करत आहे. या ठिकाणी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांनी आपल्या अकार्यक्षमतेचा कळस गाठल्याचे आयोगास दिसून येत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या अकार्यक्षम कार्यपध्दतीमुळे अपिलार्थी हे एक वर्ष ७ महिने इतक्या कालावधीपासून त्यांना हवी

असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यास वंचित राहिले आहेत. त्यांना इतक्या प्रदीर्घ कालावधीपासून माहितीसाठी वंचित ठेवण्यासाठी जन माहिती अधिकारी हे जबाबदार आहेत असे आयोगाचे मत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस इतक्या प्रदीर्घ कालावधीने देखील माहिती उपलब्ध करुन न दिल्याने व त्यायोगे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (१) चा भंग केल्यामुळे ते अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीस निःसंशयपणे पात्र ठरत आहेत असे सिध्द होत आहे.

सबब, असे आदेशीत करण्यात येते की, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे एकूण रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत आयोगास सादर करावा. अपिलार्थीस माहिती मिळण्यासंदर्भात असे आदेशीत करण्यात येते की, सध्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन अपिलीय अधिकारी यांच्या, अपिलार्थीचे अपील वेळेवर न ठरवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) चा भंग केलेल्या कृतीची व बेजबाबदार वृत्तीची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी यथायोग्यरित्या नोंद घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी वरील वर्तनाने त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेचा अभाव व बेपर्वाई स्पष्ट केली असल्यामुळे त्यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई हे आदेश निर्गमीत होताच दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास तदनंतर एका महिन्यात सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे, राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती हे आदेश निर्गमीत होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यापोटी लावलेल्या विलंबाबाबत त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- प्रमाणे रुपये २५००० /- (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतकी शास्ती त्यांना का लावण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत होताच ३० दिवसाच्या आत आयोगास सादर करावा.

४. जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीमधील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल व बेपर्वाईबद्दल त्यांच्यावर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) च्या तरतुदीनुसार, प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे यथायोग्य प्रशासकीय कारवाई, हे आदेश निर्गमीत होताच, दोन महिन्याच्या आत करुन आपला अनुपालन अहवाल तदनंतर एका महिन्यात आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३-१२-२००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गजानन व्यंकटराव हिवराळे, सह सचिव, भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन, तालुका शाखा मुखेड, व्दारा श्री. चक्रधर स्वामी कम्युनिकेशन, मेन रोड, नर्सी नाका, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक के. प्रा. शा. मेथी, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय आयोगाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/७५६

निर्णय दिनांक १७-१२-२००७

१ श्रीमती शेख हसिना नुरुद्दीन, : अपिलार्थी

१०२०, सपना, जंगम गल्ली, राहुरी,